## पुराण साहित्य

पुराण साहित्याचा समावेश प्रथमानुयोगात होत असून, त्यात अरिहंत, चक्रवर्ती या महापुरुषांची जीवन चरित्रे रेखाटलेली आढळतात. प्रथमानुयोगातील हे पुराण साहित्य म्हणजे, जैन इतिहासाचा प्रथम प्रवाह मानण्यात येतो. पुराण साहित्य आणि चरित्र साहित्य ही एकमेकांना बरीचशी जवळची असून त्यांच्यात विशेष फरक केलेला दिसत नाही. कथा, काव्य यांच्याप्रमाणे जैन मुनींनी महापुरुषांच्या चरित्राची तथा पुराणांची रचना केलेली दिसते. जेव्हा ब्राह्मणांनी पुराण ग्रंथाची रचना केली व रामायण, महाभारत यांची लोकप्रियता वाढू लागली, त्याचवेळी जैन विव्दानांनी राम, कृष्ण, विविध तीर्थंकर यांच्य जीवन चरित्राविषयी लिखाणास प्रारंभ केला. त्रेसष्टशलाकापुरुष चरित्रामध्ये २४ तीर्थकर, १२ चक्रवर्ती, ९ वासुदेवरु ९ बलदेव व ९ प्रतिवासुदेव यांचा समावेश केला आहे. कल्पसूत्रामध्ये ऋषभदेव, अरिष्टनेमि, पार्श्वनाथ व महावीर यांच्या चरित्रांचे वर्णन केले असून, समवायांग त्यातही कुलकर, तीर्थंकर, चक्रवर्ती, बलदेव, वासुदेव व प्रतिवासुदेव यांचे वर्णन आहे. परंतु ही वर्णनप्रणाली थोडी वेगळीच आहे.

याशिवाय या महान पुरुषांचे जीवन चरित्र आपणाला वसुदेवहिंडी, भरतेश्वराच्या कथावलीत, यतिवृषभाच्या तिलोयपण्णत्तीत, जिनभद्राच्या विशेषावश्यक भाष्यात, शीलांकाचार्याच्या व चउपन्नमहापुरिसचरिउ या ग्रंथातही पहावयास मिळते. या ग्रंथाच्याशिवाय काही स्वतंत्र पुराण ग्रंथाची तथा चरित्र ग्रंथांची देखील रचना झाली आहे. त्यात आपणाला आदिनाथचरित, सुमतिनाथचरित, चंद्रप्रभस्वामिचरित्र, वासुपूज्य स्वामीचरित्र, शांतिनाथचरित्र यांचा समावेश करता येईल. या सर्व महापुरुषांचे जीवन चरित्र या जैन आचार्यांनी आपल्या कल्पकतेनुसार रंगविले आहे. वासुदेव, राम, कृष्ण यांच्यावर अत्यंत सुंदररीत्या काव्य ग्रंथरचना केली आहे.

# संस्कृत जैन पुराण साहित्य

मनुष्य जीवनाच्या निर्मितीमध्ये पुराणाचे अतिशय महत्व असल्याचे आढळते. यामुळेच पुराण साहित्य सर्वसाधारण माणसांच्या श्रध्देचे एक अपूर्व ठिकाण होऊन बसल्याचेही दिसते. भारतीय धर्मग्रंथात देखील पुराण शब्दाचा उल्लेख मिळतो. सर्वसाधारणपणे ज्यात सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वंतर व वंशपरंपरा यांचे वर्णन

पाहावयास मिळते त्याला पुराण असे म्हणतात. पुराणात महापुरुषांच्या घटित घटनांच्या उल्लेखाबरोबरच त्यापासून मिळणारे फलाफल, पुण्य-पाप यांचेही वर्णन आढळते. नैतिक धार्मिक भावनांचे विशद वर्णन केलेले असून हितोपदेशाचे महान कार्य देखील पार पाडले जाते. म्हणूनच भारतीय साहित्यात पुराण साहित्याचे स्थान अनन्यसाधारण असल्याचे कोणालाही नाकरता येणार नाही.

संस्कृत जैन पुराण साहित्यात रविषेणाचे पद्मचरित अथवा पद्मपुराण्, आचार्य जिनसेनाचे हरिवंशपुराण, भगवज्जिसेनाचार्याचे आदिपुराण, गुणभद्राचार्याचे उत्तरपुराण या ग्रंथांचा समावेश करता येईल. त्यांची माहिती खालीलप्रमाणे.

**१. पद्मपुराण-**

पद्मपुराणाला पद्मचरित या नावानेही ओळखले जाते. संस्कृतमधील हे एक प्राचीन असे, दिगंबर पुराण मानले जाते. या पद्मपुराणची रचना आचार्य रविषेण यांनी केली असून लक्ष्मणसेनाचे शिष्य होते. त्यांनी पद्मचरितातील १२३ व्या पर्वातील १६७ व्या श्लोकात गुरुपरंपरेचा उल्लेख केला आहे. या गुरुपरंपरेत अनुक्रमे इंद्र, दिवाकरयति, अर्हन, मुनि, लक्ष्मणसेन व रविषेण असा नामोल्लेख केला आहे. रविषेणांनी आपल्या या पुराणाची रचना विमलसूरींच्या पउमचरिउ या ग्रंथावरुन केली आहे. या ग्रंथातील बराचसा भाग अनुष्ठूप छंदात आहे.

यातील कथेचे नायक आठवे बलभद्र पद्म (राम) व आठवे नारायण लक्ष्मण हे आहेत. या दोन्ही व्यक्ति सर्वसाधारण लोकांच्या आवडीच्याही आहेत. कवीने आपल्या अंतर्मनापासून कथेची सुरम्य अशी रचना करुन तिला आधिकाधिक प्रवाहित करण्याचे काम केले आहे. प्रसंगानुसार आ. रविषेण यांनी विद्याधरलोक, अंजना-पवनंजय, हनुमान तसेच सुकोशल यांचे चरित्र चित्रण रेखाटले आहे.

पद्मचरिताची भाषा प्रसाद गुणांनी ओतप्रोत भरली असून, अत्यंत मनोहर आहे. वन, नदी, वसंत ऋतु व इतर ऋतु, चित्रकूट पर्वत, गंगानदी यांचे अत्यंत खुबीदारपणे तसेच कौशल्याने वर्णन केले आहे. या ग्रंथाची रचना वीर निर्वाणानंतर १२०३ वर्षांनी अर्थात वि. स. ७३४ मध्ये झाली. प्रस्तुत पुराण ग्रंथ विविधतेने युक्त असून धार्मिक दृष्ट्याही त्याचे महत्व अधिक आहे.

## हरिवंशपुराण-

या संस्कृतमधील पुराण ग्रंथाची रचना आ. जिनसेन यांनी केली असून ते पुन्नाटसंघाचे होते. त्यांच्या गुरुंचे नाव कीर्तिषेण असे होते. या ग्रंथाची रचना शके ७०५ (वि. सं. ८४०) मध्ये करण्यात आली. या ग्रंथात प्रामुख्याने हरिवंशीय २२ वे तीर्थंकर नेमिनाथ व नारायण श्रीकृष्ण यांचा जीवन वृत्तांत सांगितला आहे. बाकीच्या शलाका पुरुषाचे देखील त्यांनी वर्णन केले आहे. हरिवंशाचीच यादव ही एक शाखा असून या शाखेतील अरिष्टनेमि व राजमति यांचा विवाह ठरला असता मांस भोजनासाठी सापळ्यात अडकवून ठेवलेल्या पशूंना पाहून त्यांना कसे वैराग्य उत्पन्न झाले याचेही वर्णन केले आहे. हेच वर्णन उत्तराज्झयण ग्रंथातील २२ व्या अध्यायामध्ये आपणस पाहावयास मिळते.

आ. जिनसेनांनी या ग्रंथाच्या मंगलाचरणात आ. समंतभद्र, सिध्दसेन, देवनंदि, वज्रसूरि, महासेन, रविषेण, जटासिंहनंदि, कुमारसेन, वीरसेन पार्श्वाभ्युदयकर्ते जिनसेन यांचे स्मरण केले आहे. त्यानंतर तीन केवली, पाच श्रुतकेवलि इत्यादींचा उल्लेख करुन श्रुतपरंपरेची माहिती दिली आहे. आ. जिनसेनांनी आपल्या परंपरेचा उल्लेख करुन विनयधर, गुप्तऋषि, गुप्तश्रुति, शिवगुप्त, अर्हद्‌बलि, मंदराय,मित्रविरवि, बलदेव, मित्र, पद्मसेन, नागहस्ति, नंदिषेण, तपोधन, धरसेन, सिंहसेन, अभयसेन, भीमसेन, जिनसेन, शांतिसेन इत्यादि आचार्यांचा उल्लेख केला आहे.

आ. जिनसेनांनी या विस्तृत ग्रंथाची विभागणी ६६ पर्वात केली असून त्याचा एकूण विस्तार १२००० श्लोकाइतका आहे. यात सामान्यतः अनुष्टुप छंदाचा उपयोग केला असून इतर काही सर्गातून द्रुतविलंबित, वसंततिलका, शार्दूलविक्रीडित इत्यादि छंदाचा वापर केला आहे.

हरिवंशपुराण केवळ ग्रंथ किंवा महाकाव्याच्या गुणांनी युक्त नसून ते एक उच्च कोटीचे महाकाव्य आहे. यातील अनेक सर्ग सुंदर सुंदर अलंकारांनी परिपूर्ण आहेत. हरिवंश पुराणातील लोकवर्णन प्रसिध्द असून ते त्रैलोक्य प्रज्ञप्तिपासून घेतलेले दिसते. लोकाविषयीचे विवेचन अत्यंत विस्तृत सुंदररीत्या केले आहे. त्यासाठी काही काही ठिकाणी करण व सूत्रांचाही वापर केला आहे.

## महापुराण-

संस्कृत जैन दिगंबर पुराण साहित्यामध्ये महापुराणाचा तिसरा क्रमांक येतो. महापुराणाचे दोन खंड आहेत. प्रथम खंडाला आदिपुराण तथा पूर्वपुराण असे म्हटले असून दुसऱ्या खंडाला उत्तरपुराण म्हटले आहे. आदिपुराणात एकूण ४७ पर्व असून, त्यातील ४२ पूर्व व ४३ व्य पर्वातील तीसऱ्या श्लोकापर्यंतचा भाग आचार्य भगवज्जिनसेनांचे प्रमुख शिष्य श्रीगुणभद्राचार्यांनी पूर्ण केला आहे.

आ. भगवज्जिनसेनरचित आदिपुराण हा जैन पुराणातील सर्वोत्कृष्ट असा ग्रंथ मानला जातो. यात काव्याबरोबर महाकाव्याची देखील संपूर्ण वैशिष्ट्ये आढळतात. स्वतः कवीने या पुराणाला 'धर्मानुबंधिनी कथा' असे म्हटले आहे. जो पुरुष यशरुपी धनाचा संचय आणि पुष्परुपी पुण्याचा व्यवहार करु इच्छितो त्यांच्यासाठी धर्मकथेचे विवरण करणारा हा ग्रंथ मूलधनाप्रमाणे आहे. म्हणूनच या ग्रंथाला संस्कृत पुराण साहित्यातील एक मौल्यवान रत्न मानले जाते.

आदिपुराणाच्या प्रस्तावनेमध्ये सिध्दसेन, समंतभद्र, श्रीदत्त, प्रभाचंद्र, शिवकोटी, जटाचार्य, काणभिक्षु, भट्टाकलंक, श्रीपाल, पात्रकेसरी, वादीभसिंह वीरसेन, जयसेन वगैरे आचार्यांची स्तुति केली आहे. गुणाढ्याच्या बृहत्कथेचाही यात उल्लेख मिळतो. या आदिपुराणामध्ये प्रथम तीर्थंकर आदिनाथ यांचे चरित्र वर्णिले असून इतर अन्य महापुरुषांची चरित्रे देखील यात आली आहेत. कथानायक वृषभदेव व सम्राट भरत हे आहेत. या कथानायकांचे चरित्र चित्रण हृदयस्पर्शी झाले आहे. हिरवा शालू पांघरुन बसलेली पृथ्वी अथवा वन, मंद मंद शीतल वायु लहरी, फुलांनी बहारुन आलेल्या पुष्पवेली, कलकल आवाज करीत वाहणारी सरिता, कमल ताटव्यांनी युक्त सरोवर, उंचच उंच पहाड, त्यावरुन वाहणारे पांढऱ्या शुभ्र पाण्याचे झरे, सूर्योदय, सूर्यास्त, चंद्रोदय इत्यादि गोष्टींचे इतके मार्मिक व सुंदर वर्णन केलेले आहे की, वाचक आपले देहभान हरवून बसतो. याशिवाय वर्षाऋतूचेवेळी चमचमाट करणारी बिजली, गडगडाट करणारे ढग, सूर्यकिरणांचा अंधुक स्पर्श, रंगीबिरंगी इंद्रधनुष्य, टाहो फोडणारे तथा नृत्य करणारे मयूर, आनंदीत व संतोषी, झालेले चातक पक्षी या सर्व वर्षाकालीन सृष्टीसौंदर्याचे वाचन करीत असताना कोणता बरे वाचक आपले देहभान विसरणार नाही ?

या ग्रंथात पुराण, महाकाव्य, धर्मकथा, धर्मशास्त्र, राजनीतिशास्त्र, आचारशास्त्र, सौंदर्य समृध्दि या सर्वांचा समावेश झाला आहे. म्हणूनच या महापुराणाला एक महान ज्ञानकोष असे म्हटले जाते.

**उत्तरपुराण-**

उत्तरपुराण हा महापुराणाचा दुसरा खंड असून, त्याची रचना गुणभद्राचार्यांनी केली आहे. यात अजितनाथपासून २३ तीर्थंकर, ११ चक्रवर्ती, ९ नारायण, ९ बलभ्रद आणि ९ प्रतिनारायण तसेच जीवंधर

स्वामी इत्यादि विशिष्ठ पुरुषांची चरित्रे अगदी थोडक्यात व शास्त्रोक्त पध्दतीने सांगण्यात आली आहेत. उत्तर पुराणातील ६८ व्या पर्वामध्ये रामचरित्र आले आहे. हे रामचरित्र विमलसूरींच्या 'पउमचरिउ' मधील रामचरित्रांपेक्षा भिन्न आहे. दशरथ राजा, त्याच्या पत्नी, राम, लक्ष्मण, राम-सीता विवाह, सीतेचे रावणाकडून हरण, लक्ष्मण मरण वगैरे विविध गोष्टींचे वर्णन यात आले आहे. पउमचरिउ ग्रंथापेक्षा गुणभद्रांच्या उत्तर पुराणात अनेक नवनवीन वैशिष्ठ्ये दिसून येतात. यातील विविध सुभाषितांनी वाचकांचे मन प्रसन्न होते.

उत्तर पुराणात १६ छंद असून त्यात ७५७५ पद्ये आहेत. अनुष्ठूप छंदात त्यांचा विस्तार ७८७८ इतका आहे. आदिपुराण व उत्तरपुराण मिळून दोहोंचा म्हणजेच महापुराणाचा विस्तार १९२०७ अनुष्ठूप इतका आहे.

थोडक्यात उत्तरपुराण हा पुराण साहित्यातील एक महत्वाचा ग्रंथ मानला जात असून नाविन्यतेच्या व भाषाशैलीच्या दृष्टीने महत्वाचा आहे.

प्रस्तुत संस्कृत जैन पुराण साहित्याशिवाय आपणाला हेमचंद्रांनी लिहिलेले त्रिषष्टि शलाकापुरिषचरित (इ. स. ११६० ते ११७२), पंडित आशाधर कृत त्रिशष्टि स्मृतिशास्त्रख मेरुतुंगरचित महापुराणचरित, पद्मसुंदराने लिहिलेला रायमल्लाभ्युदय, दामनंदिकृत पुराणसारसंग्रह या ग्रंथाचाही समावेश करता येईल.

पूर्वीपासून पुराणसाहित्य सर्वसाधारणजणांचे भक्तिस्थान, श्रध्दास्थान व चेतनास्थान असल्यामुळे, या साहित्याला देखील आपोआपच महान महत्व प्राप्त झाले आहे. रात्रंदिन जीवन जगण्याच्या धडपडीत अथवा संसारजाळ्यात अडकून पडलेल्या मनुष्यावरच्या पुराणसाहित्यातील श्रेष्ठ हितोपदेशाचे अमृतसिंचन होताच तो उत्साही, प्रफुल्लित व संयमी झाल्याशिवाय राहणार नाही. आणि हाच पुराणाचा खरा विजय मानला तर अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

## प्राकृत पुराण साहित्य

प्राकृत पुराण साहित्यात आपणाला यतिवृषभरचित तिलोयपण्णत्ति, विमलसूरिरचित पउमचरिउ, शीलाकंकरचित चउपन्नमहापुरिस चरिउ तथा भद्रेश्वरकृत कहावली यांचा समावेश करता येईल. यातील चरिउ ग्रंथ चरितनामान्त पुराण साहित्यातच समाविष्ठ केले आहेत.

**तिलोयपण्णति-** या ग्रंथाची रचना आचार्य यतिवृषभांनी केली आहे. चरित्र ग्रंथातील हा एक महत्वाचा व प्राचीन ग्रंथ मानला जात असून या ग्रंथातील चौथ्या महाधिकारामध्ये विविध महापुरुषांचा वृत्तांत आला आहे. या अधिकारात एकूण ४२१ ते ५०९ पर्यंत १४ मनु किंवा कुलकर यांचा उल्लेख करुन क्रमाने १४११ व्या गाथेपर्यंत त्यांचे वर्णन केले आहे. त्यात तीर्थंकरांच्या जन्मतिथी, जन्मनक्षत्र, वंश, आयुप्रमाण, कुमारकाल, शरीरवर्णन, राज्यकाल, चिन्ह, राज्यपद, वैराग्यकारण, वैराग्यभावना, दीक्षास्थान, तिथी, काल, नक्षत्र, वन, उपवासांचा नामोल्लेख, दीक्षापूर्वक उपवास संख्या, पारणाकाल, पारणानक्षत्र, केवलज्ञानाचा अंतरकाल, समवसरणरचना वगैरे अनेक बाबींचे वर्णन केले आहे. गाथा १४३७ च्या दरम्यान अंतिम बलदेव, श्रीकृष्णाचे वडिलबंधू, त्यांची स्वर्गप्राप्ति यांचा उल्लेख करुन त्यानंतर ११ रुद्र, ९ नारद व २४ कामदेव यांचा वृत्तांत सांगितला आहे. केवली, पूर्वधारी, अंगधारी, आचारांगधारी यांचा कालखंड, तत्कालीन राजे वगैरेंचे वर्णन यात केले आहे. पौराणिक व ऐतिहासिकदृष्ट्या हा ग्रंथ अत्यंत महत्वाचा आहे. मुख्यतः यात भौगोलिक व खगोल विषयक गोष्टींचे वर्णन केले असून, प्रसंगानुरुप जैनसिध्दांत पुराण, इतिहास यावर प्रकाश टाकला आहे. हा प्राकृत भाषेतील १८००० श्लोकांनी युक्त असा महान ग्रंथ आहे.

**पउमचरिउ-**

पउतचरिउ या ग्रंथात रामचरित्राचे वर्णन करण्यात आले असून, 'पउम' हे रामाचे दुसरे नाव आहे. विमलसूरि यांनी या ग्रंथाची रचना केली असून, ते नागील वंशीय आचार्य राहूचे प्रशिष्य होते. 'वाल्मिकी रामायणाच्या' आधारे प्रस्तुत ग्रंथाची रचना करण्यात आली आहे. या ग्रंथाची विभागणी एकूण ११८ पर्वामध्ये केली असून या ग्रंथाच्या रचनाकालाविषयी मतभेद असलेला दिसून येतो. कवीने स्वतः रचनाकाल वीर निर्वाणानंतर ५३० वे वर्ष अर्थात इ. स. ६० च्या आसपास सांगितला आहे. इतर काही विव्दान याचा रचनाकाल ३-४ शतक सांगतात. विमलसूरींच्या मतानुसार वाल्मिकी रामायण विपरीत अविश्वसनीय व अतिशयोक्तीने भरलेले आहे. त्यावर विव्दानांचा विश्वास बसू शकत नाही. म्हणूनच या ग्रंथाची रचना वास्तवतेला धरुन करण्यात आली आहे. राजा श्रेणिकाने विचारलेल्या प्रश्नावर गौतम गणधरांनी उत्तरे दिली आहेत. आणि याच विषयीचे विवेचन विमलसूरींनी पउमचरिउ ग्रंथात केले आहे.

पउमचरिउ ग्रंथात दशरथ राजाच्या कौशल्या, अपराजिता, सुमित्रा, कैकयी व सुप्रभा या चार राण्या असून त्याचे पुत्र राम, लक्ष्मण हे अनंक राजकन्यांशी विवाह करतात. रावणाच्याही अनेक राण्यांचा उल्लेख

यात केला असून, हनुमानाचा विवाह रावणाची भाची अनंगकुसुमाबरोबर झाल्याचे म्हटले आहे. रावणाला प्रत्यक्ष १० तोंडे नसून त्याच्या गळ्यातील नवरत्न हारात प्रतिबिंबित झालेली नऊ व त्याचे एक अशी दहा तोंडे असल्याचा उल्लेख केला आहे. स्वतः लेखकाच्या मतानुसार पउमचरिउमध्ये स्थिति, वंशोत्पत्ति, प्रस्थान, रण, लवणांकुश, जन्म निर्वाण व अनेक भव असे सात अधिकार असून, रामाच्या जन्मापासून निर्वाणापर्यंतचे वर्णन यात केले आहे.

कथेचा अंत जैन कल्पनेनुसारच केला आहे. सीता अग्नि परीक्षेत सफल झाल्यावर जैन दीक्षा घेऊन स्वर्गप्राप्ति करुन घेते. रावणवधाच्या अपराधामुळे लक्ष्मणाला नरकात जावे लागते तर अहिंसाव्रतधारी राम दीक्षा घेऊन व साधना करुन मोक्षप्राप्ति करुन घेतो.

प्रस्तुत ग्रंथामध्ये अनेक उपकथांचा समावेश करण्यात आला असून उद्देशकाच्या शेवटी विविध छंदाचा वापर केला आहे. कथनशैली सर्व ठिकाणी सरळ, प्रवाही व कथाप्रधान आहे. उपमा, अलंकार, सुभाषिते, रसपूर्ण, वर्णने यांचा समावेश अधिक आहे. या ग्रंथाची शैली रामायण, महाभारत व पुराण यांच्या शैलीप्रमाणेच आहे. अलंकार, रसप्रधानता या मानाने कथानक गौण ठरले आहे. या चरित्र काव्यात प्रसंगानुरुप नदी, सरोवर, ॠतु, संध्या, युध्द यांच वर्णन करण्यात आले आहे. शैलीत प्रवाहीपणा व जोर आहे. या ग्रंथातील शब्दकोष समृध्द असून, देशी शब्दांचाही भरणा अधिक आहे. व्याकरणाची विविध व विचित्र रुपेही यात पाहावयास मिळतात. विमलसूरिरचित प्रस्तुत पउमचरिउ हा ग्रंथ सर्वांग परिपूर्ण झालेला दिसून येतो.

## २. चउपन्नमहापुरिस-चरित्र-

या ग्रंथात ९ प्रतिवासुदेवांना सोडून देऊन राहिलेल्या ५४ महापुरुषांचे वर्णन करण्यात आले. या ग्रंथाची रचना शीलांकसूरि यांनी केली असून तो एक विस्तृत असा ग्रंथ आहे. या ग्रंथाची रचना वि. सं. ९२५ अर्थात इ.स. ८६८ मध्ये झाली असावी. हा ग्रंथ प्रामुख्याने पद्यात लिहिला असून प्रसंगी गद्याचाही वापर केला आहे. यातील पुष्कळसे वर्णन विमलसूरींच्या 'पउमचरिउ' प्रमाणेच आहे. तीर्थंकर चक्रवर्ती यांची चरित्रे जैन परंपरेला अनुसरनुच रेखाटली आहेत. विमलसूरींनी पउमचरिउ ग्रंथात रावणाच्या वहिणीच नाव चंद्रनखा असल्याचे म्हटले आहे तर प्रस्तुत ग्रंथात तिचे नाव शूर्पनखा असल्याचे सांगितले आहे. याशिवाय रावणाने लक्ष्मणाच्या स्वरुपात सिंहनाद करुन रामाला फसविले असल्याचा उल्लेख केला आहे तर, या चउपन्महापुरिस

चरित्रामध्ये सुवर्णमय मृगाच्या पाठीमागे धावल्यामुळे रामाला सीता वियोग झाल्याचे म्हटले आहे. राम हा दीक्षा घेऊन स्वर्गप्राप्ति करुन घेत असल्याचा उल्लेख पउमचरिउमध्ये आहे, तर या ठिकाणी तसा उल्लेख नाही.

थोडक्यात शीलांकसूरिकृत चउपन्नमहापुरिस-चरिउ या ग्रंथावर वाल्मिकी रामायणाचा अधिकाधिक प्रभाव पडलेला दिसून येतो. पउमचरिउच्या मानाने या ग्रंथात रेखाटलेले राम-लक्ष्मणाचे चरित्र संक्षेपाने घेतले आहे. चरित्रवर्णनाच्या दृष्टीने या ग्रंथाचे महत्व अधिक मानले जाते.

**कहावली-**

'कहावली' ग्रंथाची रचना भद्रेश्वर यांनी केली असून, त्यात त्यांनी ६३ महापुरुषांची चरित्रे वर्णिली आहेत. महापुरुष चरित्राच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्वाचा आहे. भद्रेश्वर हे अभय देवाचे गुरु असून त्यांनी या ग्रंथाची रचना १२ व्या शतकाच्या प्रारंभी केली असावी. ही ग्रंथरचना पूर्णतः प्राकृत गद्यात असून क्वचित ठिकाणी पद्याचाही वापर केला आहे. या कथेची सुरुवात रामकहा भकइ, वाणरकहा भकइ अशारीतीने केली असून बहुतेक या कथेची रचना विमलसूरींच्या पउमचरिउप्रमाणेच केली आहे. या चरित्र ग्रंथात कसल्याही प्रकारचे विभाग, उपविभाग केलेले दिसून येत नाहीत.

प्रस्तुत कथेत सीतेला सवतिमत्सरापासून झालेल्या त्रासाचे सुंदर वर्णन केले आहे. सीतेला फसविण्यासाठी म्हणून तिला तिच्या सवतीने रावणाचे चित्र काढावयास सांगितले. सीतेने रावणाला कधीच न पाहिल्यामुळे तिने फक्त त्याच्या पायाचे चित्र रेखाटले. ते चित्र सवतीने रामाला दाखवून, सीता रावण चरणीच लीन झाली असल्याचे सांगितले. परंतु रामाने त्यावेळी काही प्रतिक्रिया दाखविली नाही. परंतु त्याचवेळी संधी साधून सीतेच्या सवतीने सीतेच्या चारित्राविषयी लोकामध्ये गैरसमज पसरविला. या सर्व हालचालीमुळे रामाला देखील सीतेचा त्याग करावा लागला. या ग्रंथात आलेल्या विविध कथा अतिरोचक असून त्याचबरोबर महान पुरुषांचे चरित्र रेखाटण्याचे महान कार्य भद्रेश्वराने कहावली चरित्र ग्रंथाच्या साह्याने पार पाडले आहे.

## अपभ्रंश पुराण साहित्य

स्वयंभूरचित पउमचरिउ-

अपभ्रंश पुराण साहित्यात तथा महाकाव्यात स्वयंभूकृत पउमचरिउ हे अपभ्रंश महाकाव्य सर्वात प्राचीन मानले जाते. या ग्रंथांची रचना इ.स. ७०० च्या सुमारास झाली असावी. तसे पाहता प्राकृत व अपभ्रंश प्रथमानुयोगाची सुरुवात रामकथेपासून झालेली दिसून येते. रामकथेवरील साहित्य सर्वाधिक लोकप्रिय असून, हिंदू, बौध्द, जैन या तिन्ही धर्मामध्ये ही कथा वेगवेगळ्या रुपाने सांगण्यात आली आहे. सर्वजण रामाला महापुरुष मानतात. सर्वात प्रथम वाल्मिकीने 'वाल्मिकी रामायण' लिहिले, त्यानंतर इतर सर्वांनी त्याचे अनुकरण केलेले दिसते. पउमचरिउचा कर्ता स्वयंभू हा अपभ्रंशमधील एक महाकवि म्हणून गणला जातो. तो स्वतः सौंदर्याने जरी विद्रूप असला तरी त्याचे अंतरंग सौंदर्यसृष्टीने व्यापून राहिले होते. त्याच्या असणाऱ्या दोन पत्नींनी देखील काव्यरचनेच्या कामात साह्य केल्याचा उल्लेख मिळतो. त्याच्या दोन पत्नींची नावे अमृतांबा व आदित्यांबा अशी आढळत असून त्याच्या पित्याचे नाव मारुतदेव व मातेचे नाव पद्मिनी असे होते.

स्वयंभूकृत 'पउमचरिउ' हा ग्रंथ अनेक दृष्टीने महत्वाचा असून, या ग्रंथात एकूण १२००० इतके श्लोक आहेत. या ग्रंथात एकुण विद्याधर, अयोध्या, सुंदर युध्द व इतर असे पाच कांड असून संधीची संख्या ९० इतकी आहे. ग्रंथारंभी कवीने पूर्ववर्ती भरत, पिंगल, भामह, दंडी या कवींचा उल्लेख करुन पंचमहाकाव्यांचाही उल्लेख केला आहे. ही रामकथारुपी नदी वर्धमानमुखकंदरात उगम पावून ती गणधरांनी पाहिली. नंतर इंद्रभूति, आचार्य, सुधर्म व कीर्तिधर यामार्गे वाहत वाहत रविषेण आचार्यांच्या कृपेने ती स्वयंभूला मिळाली. स्वयंभूव्दारा या ग्रंथाची पूर्णपणे रचना होऊ शकली नाही म्हणून, अर्धवट राहिलेली ती रचना त्याचा पुत्र त्रिभुवन स्वयंभू याने पुरी केली असल्याचाही उल्लेख मिळतो. य मताशी डॉ. भायाणी सहमत असून नाथूराम प्रेमी वगैरे विव्दान सहमत नाहीत.

स्वयंभूकृत पउमचरिउ हे महाकाव्य काव्यशैलीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. महाकाव्याच्या सर्व वैशिष्ठ्यांचे पालन या कवीने केलेले दिसून येते. प्रारंभी गुरुवंदना करुन स्वत:विषयीची माहिती दिली आहे. पंडितांना उद्देशून स्वतः कुकवि असल्याचे व स्वतः व्याकरण, नियम, इतर महाकाव्य याविषयी अज्ञान असल्याचे जाहीर करुन विनम्रता प्रकट केली आहे. त्यानंतर सज्जन-दुर्जन यामधील भेद सांगून जैन रामकथेची परंपरा प्रकट करुन काव्याला सुरुवात केली आहे. रसात्मकता व सौंदर्य उत्पन्न करण्यासाठी कवीने मर्मस्पर्शी भावांचे चित्रण, प्राकृतिकदृश्य, विविध घटना तथा वर्णनांचा आधार घेतला आहे. धार्मिक रुढीला चिकटून न बसता काव्यता, स्वच्छंदपणा उत्पन्न केली आहे. सारख्याच शब्दांची पुनरुक्ति करुन काव्यात एक प्रकारचा नाद उत्पन्न केला आहे.

धग धग धग धगंतु उध्दाइउ, हस हस हस हसंतु संपाइउ ।
जल जल जल जलंतु पंचलंतउ जालावलि फलिंग मेल्लंतल ॥

कवीने उपमा, उत्प्रेक्षा, श्लेष, अनुप्रास, यमक, तद्‌गुण, अनन्वय, अपन्हुति, इत्यादि अलंकारांचा सहज स्वाभाविकपणे वापर केला असून गंधोदकधारा, मंजरी, झालमांजिका, क्लिासिनी, प्रमाणिका, समानिका, भुंजगप्रयात या छंदाचा वापर केला आहे.

हरिवंशपुराण अथवा रिट्ठणेमिचरिउ-

स्वयंभूने लिहिलेले 'रिट्ठणेमिचरिउ' हे दुसरे महाकाव्य तथा पुराण आहे. हे महाभारतीय हरिवंशाचे जैन पुराण आहे. १० व्या शतकात या विषयावर अनेक अपभ्रंश रचना लिहिल्या गेल्या आहेत. १० व्या शतकात कवि धवलाने 'हरिवंश पुराण', पुष्पदंताचे 'महापुराण' तसेच १५-१६ व्या शतकातील कवि पंडित रइधूकृत 'हरिवंश पुराण' वा 'रिट्ठणेमिचरिउ' याची उदाहणे आहेत. परंतु महाभारत व हरिवंश संबंधी जैन काव्य ग्रंथात स्वयंभूचे 'हरिवंशपुराण' सर्वोत्कृष्ट आहे. या काव्याच्या उत्थानिकेत कवीने भरत, पिंगल, भामह व दंडी यांच्याशिवाय इंद्र, बाण, चतुर्मुख यांचे ऋण मान्य केले आहे. या महाकाव्यात एकूण ११२ संधी आहेत. याचे अध्ययन केल्यावर असे समजते की, स्वयंभूने यातील ९२ संधीची रचना केली होती. त्यात यादवकांड, कुरुकांड, युध्दकांड यांचा समावेश होतो. या कवीच्या असामान्य काव्यप्रतिभेमुळे सर्व वर्णन फार सुंदर व रोचक झाले आहे. पुष्पदंताने आपल्या काव्यात नगर, पर्वत, नद्या, विविध ऋतु, सूर्योदय, चंद्रोदय, विरह, मिलन आदीचे वर्णन केले आहे. त्यांनतर त्रिभुवनाने त्यात १७ संधीची भर घातली. राहिलेल्या ६ संधीची रचना यशकीर्तिने केलेली असावी. यशः कीर्तीचा काल १५ वे शतक मानला जातो. पउमचरिउप्रमाणेच या काव्यात देवस्तुति, पूर्व कविप्रशंसा, विनम्रता प्रदर्शन, विषयाची महानता व स्वतःची अल्पज्ञता प्रकट केली आहे. श्रेणिक आणि गणधर यांच्या प्रश्नोत्तररुपाने काव्याला सुरुवात केली आहे. ही शैली चंदबरदायीच्या पृथ्वीराजरासेप्रमाणेच आहेत. कवीने महाभारत व हरिवंशपुराणाचा जरी आधार घेतला असला तरी, समयानुकूल त्यात बरेच परिवर्तन तथा बदल केला आहे. द्रौपदी स्वयंवराच्या वेळी मत्स्यवेधाचा उल्लेख न करता अर्जुनाने धनुष्यावर चढविलेल्या बाणाचाच फक्त उल्लेख करण्यात आला आहे. प्रस्तुत बाबीवरुन जैन अहिंसेचा प्रभाव प्रकट केला आहे. कथा सहज स्वाभाविक आहे. योध्द्यांचे वर्णन वर्णनीय आहे.

भज्जतं सभाउइं । जुज्झझंत सुहडाइं । णिग्गंत अंताइ । भिग्गंत गत्ताइं ॥
लोटंत चिंघाई । तहटंत छताइं । (हरिवंशपुराण ७-६)

कवि स्वयंभूची शैली सहज स्वभाविक असली तरी, त्याच्या शैलीवर बापाच्या संस्कृत शैलीचा प्रभाव दिसून येतो. एकंदरीत हे काव्य इतर काव्याहून नाविन्यतेच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

**धवलरचित : हरिवंश पुराण -**

हरिवंश पुराण या ग्रंथाची रचना कवि धवलाने केली असून त्याचा काळ अंदाजे ११ वे १२ शतक मानला जातो. या ग्रंथात एकूण ११२ संधी आहेत. हा कवि विप्रवर्णीय असून त्याच्या पित्याचे नाव सूर व आईचे केसुल्ल थिा गुरुचे नांव अंबसेन असे होते. कवीने आपल्या काव्यात महासेन, रविषेण, जिनसेन, जटिलमुनि इत्यादींचा उल्लेख केला आहे. इतर कांही ग्रंथकार व त्यांच्या ग्रंथंचाही उल्लेख आहे. या काव्यातील वर्णनासाठी कवीन जिनसेनाच्या हरिवंश पुराणाचा आधार घेतल्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे. संस्कृत हरिवंशपुराण १२००० श्लोक प्रमाण आहे तर, या ग्रंथात १८००० श्लोक आहेत. वर्णन वैचित्र्यामुळे कदाचित् हा विस्तार झाला असावा. विविध काव्यगुणांच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्वाचा असून त्यात अनेक छंदाचाही वापर केला आहे.

**यशःकीर्तीरचित हरिवंशपुराण -**

स्वयंभूच्या हरिवंश पुराणातील शेवटच्या संधीमध्ये आपणाला यशःकीर्तीचा उल्लेख मिळतो. या ग्रंथाशिवाय यशःकीर्तीने स्वतः एका स्वतंत्र हरिवंश पुराणाची रचना केली असावी. त्याचा रचनाकाल साधारणपणे वि. स. १५०० किंवा १५२० इतका असावा. या ग्रंथात १३ संधी असून तो ग्रंथ गर्ग गोत्रीय दिउढा साधूच्या प्रेरणेवरुन लिहिला असावा. या ग्रंथतील कथानकासाठी जिनसेन, स्वयंभू पुष्पदंत यांच्या रचनांचा आधार घेतला असावा. श्रुतकीर्तीकृत आणखी एका हरिवंश पुराणाचा उल्लेख मिळत असून त्यात ४४ संधी असून त्याची रचना वि.स. १५५३ मध्ये झाली असावी.

**पुष्पदंतकृत तिसट्ठि महापुरिस गुणालंकार -**

पुष्पदंत कवि मान्यवरखेटचे भरत व त्याचा पुत्र नन्न यांच्या आश्रयास रहात असून त्यांना आपल्या कवित्वाचा मोठा अभिमान होता. त्यांनी स्वतःला काव्य-पिसल्ल, अभिमान-मेरु, कविकुलतिलक, काव्यरत्नाकर, सरस्वती-निलय इत्यादि उपाधींनी विभूषित केले होते. विद्वानांनी यांचा काल सुमारे १० वे शतक इतका मानला आहे. पुष्पदंतांचे व्यक्तित्व तेजस्वी आणि प्रगल्भ होते. या कवीने स्वतःचा वैयक्तिक

परिचय देखील दिला आहे. त्यांच्या वडिलांचे नाव केशव व मातेचे नाव मुग्धादेवी होते. प्रथम ते शैव होते. नंतर जैनधर्मीय बनले.

प्राकृतमधील चउपण्णमहपुरिस व संस्कृतमधील त्रेसष्ट शलाकापुरुष चरित ग्रंथावलीप्रमाणेच अपभ्रंश भाषेत महाकवि पुष्पदंताने 'तिसट्ठिमहापुरिसगुणालंकारु' या महाकाव्याची रचना केली आहे. या महाकाव्याचे दोन खंड केले आहेत - १. आदिपुराण, २. उत्तरपुराण. आदिपुराणात तीर्थंकर ऋषभनाथांचे चरित्र सांगितले असून, उत्तर पुराणात इतर २/३ तीर्थंकरांच्या जीवनगाथांचा उल्लेख केला आहे. या दोन्हींचा एकमेकाशी विशेष संबंध नाही. त्याबरोबरच चक्रवर्ती, वासुदेव, प्रतिवासुदेव व बलदेव मिळून ६३ महापुरुषांच्या कथा दिल्या आहेत. हा विशालकाय ग्रंथ अनेक दृष्टींनी महत्वाचा असून राम आणि कृष्ण यांचे जैनस्वरुप येथे पहावयास मिळते. पुष्पदंतांची काव्यशैली प्रवाहयुक्त असून ती विविध अलंकार व छंदानी विभूषित झली आहे. अर्थात् या ग्रंथात प्राकृत लक्षण, समस्त नीति, छंद, अलंकार, रस तत्वार्थ निर्णयादि सर्व काही आले ओ. या कवीच्या असामान्य काव्यप्रतिभेमुळे सर्व वर्णन फारच सुंदर व रोचक झाले आहे. पुष्पदंताने आपल्या या महाकाव्यात नगर, पर्वत, नद्या, ऋतु, सूर्योदय, चंद्रोदय, विरह, मिलन, विवाह, युध्द इत्यादि विविध गोष्टींचे आकर्षक शैलीत वर्णन केले आहे. एवढेच नव्हे तर या जैन महाकाव्यात जी काही वैशिष्ठ्ये आहेत ती अन्यत्र पहावयास मिळत नाहीत.

**जैन कथासाहित्य**

कथासाहित्य हे साहित्याचे एक प्रमुख अंग मनाले जाते. या साहित्याला सर्वाधिक लोकप्रियता प्राप्त झालेली दिसते. विश्वातील सर्वोत्कृष्ठ काव्याची जनी कथाच आहे. मानवी मन कथेकडे सहजपणे आकर्षित होते. अर्थात प्रत्येक देशामध्ये आपापल्या देशाच्या लोककथा असतात. त्या कथांच्याद्वारे त्या देशाची तत्कालीन परिस्थिती, चालीरीती, संस्कृती इत्यादींचे सुंदर ज्ञान मिळते. जेंव्हा मानव रानावनात वास्तव्य करीत होता त्यावेळी मधुर कूजन करणारे पक्षी, कलकल निनाद करणारे झरे तथा बहारुन आलेल्या वृक्षवेली त्याचे मनोरंजन करीत असत. या सर्वांच्या सानिध्यात तो अगदी रममाण होऊन जात असे. परंतु पुढे मानव सुसंस्कृत झाल्यावर त्याने आपला हा स्नेहभाव कथांच्याद्वारे विकसित केला आणि कथा आकर्षित करण्यासाठी त्यात नैसर्गिक दृश्यांचे आपोआपच आगमन झाले व पुढे हळुहळू कथासाहित्य अधिक वृध्दिंगत होऊ लागले.

प्राचीन भारतीय साहित्यात कथेची तत्वे आपणास पाहावयास मिळतात. सर्वप्रथम मानल्या जाणा-या ऋग्वेदात देखील ही तत्वे आपणास मिळतात. ब्राह्मणग्रंथात देखील अनेककथा आढळतात. पुरुरवा व उर्वशी यांची कथा तर प्रसिध्दच आहे. हे कथासाहित्य उपनिषद कालाच्या पूर्वीचे आहे. उपनिषदामध्ये

कथासहित्याला एक नवीन रुप प्राप्त झाले आहे. यात राजा जानश्रुतीच्या कथेचे चित्रण पाहावयास मिळते. पुराणामध्ये कथासाहित्य अधिक उत्कटतेने प्रकट झालेले दिसते. यातून वेदांच्या गूढ गोष्टींचा खुलासा केला आहे. पुराण वेदाध्ययनाची संपत्ती आहे. वंदातील मूलभूत कथा पुराण कथातून पल्लवित झाल्या आहेत. खरोखर पुराण हे कथासाहित्याचे एक महान भांडारे आहे.

रामायण महाभारतात अनेक कथांचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. तसे पाहता रामायण व महाभारत हे दोन्ही एक प्रकारे कथांचे कोषच आहेच. अशा प्रकारे कथासाहित्याची एक प्राचीन परंपरा आहे. त्यात पंचतंत्र, हितोपदेश, बेताल पंचविंशतिका, सिंहसनद्वात्रिंशिका, शुकसप्तति, बृहत्कथामंजरी, कथासरित्सागर, आख्यानयामिनी जातक कथा इ. कथा विशेष उल्लेखनीय आहेत.

सामान्यपणे कथासाहित्याचे दोन प्रकारे विभाजन केले जाते. एक लोककथासाहित्य आणि अभिजात कथासाहित्य. लोककथेमध्ये सामान्य माणसाचे स्वभावचित्रण केलेले असते. सामान्य जनांच्या भाषेत ती लिहिलेली असते. या कथेचे सृजन जनमनात होते. मनुष्य जातीतील आदिम परंपरा प्रथा व त्यांचे विभ्भिन्न प्रकार, त्यांच्या विभिन्न श्रध्दा यांचे विलक्षण मिश्रण लोककथेत झालेले दिसते. नृत्य, जादू, वशीकरण, भाग्य, शकुन, शेती प्रकार, सामाजिक रीतीरिवाज ह्या गोष्टी लोककथेत अंतर्भूत असतात. यापेक्षा अभिजात कथेचे स्वरुप निश्चितपणे विकसित स्तरावर गेलेले आढळते. सुशिक्षित, श्रीमंत सुसंस्कृत, श्रीमंत सुसंस्कृत समाजातील विलासपूर्ण जीवन, त्यांच्या परंपरा व त्यांच्या चालीरुढीचे चित्रण हा त्यांचा उद्देश असतो. या प्रकारच्या कथेची भाषा देखील असाधारणच असते. सुसंस्कृत भाषेत या कथा लिहिलेल्या आढळतात. सर्वसामान्य जनांना समजण्यासाठी लिहिलेल्या बहुतेक कथा प्राकृत भाषेतच लिहिलेल्या आढळून येतात.

कथासाहित्यरुपी सरितेला अधिक प्रवाही व वेगवान करण्यामध्ये जैनकथासाहित्याचे योगदान अधिक उल्लेखनीय असे आहे. जैन आगमातील द्वादशांग याबाबतीत अधिक प्रसिध्द आहे. त्यामध्ये नायाधम्मकहा, उवासगदसाओ, उल्तगडदसाओ, अनुत्तररौपपातिक, विपाकसूत्र इ. ग्रंथ कथात्मक आहेत. याशिवाय सूयगडांग, भगवती ठाणांग यामध्ये अनेक रुपक कथा असून त्या अतिशय भावपूर्ण व प्रभावजनक आहेत. तरंगवती, समराइच्चकहा तथा कुवलयमाला इत्यादि अनेक स्वतंत्र कथाग्रंथ विश्वातील सर्वोत्तम कथाग्रंथ म्हणून मानले गेले आहेत. या कथासाहित्याचे अध्ययन इतिहासाच्या क्रमाने तथा यथायोग्य केले तर काही नवीन गोष्टी प्रकाशात येऊन शकतील व जैन कथासाहित्य वैदिक कथाहून अधिक प्राचीन काळचे असावे हे सिध्द होऊ शकेल. जैनांचे पुरातन साहित्य पूर्णत: कथांनी बध्द झालेले आहे. डॉ.वासुदेवशरण अग्रवाल यांच्या मते बौध्द कथासाहित्यापेक्षा विविध भाषेंच्या माध्यमाद्वारे प्रगट झालेले जैनकथासाहित्य भारतीय

साहित्यात एक अद्वितीय साहित्य म्हणून ओळखले जाईल. विक्रम संवताच्या प्रारंभापासून १९ व्या शतकापर्यंत जैनकथासाहित्याची परंपरा अखंडितपणे दिसून येते.

जैन कथासाहित्यात लोककथांचे स्वागत अगदी मनमोकळेपणाने केलेले आहे. मध्यकालीन भारतीय साहित्यावर जैन कथा साहित्याचा अधिक प्रभाव पडलेला दिसून येतो. सदयवच्छ सावलिंगाच्या कथेचा उल्लेख जायसीने पद्मावत काव्यात तर त्याच्यापूर्वी अब्दुल रहमान याने संदेशदासक या काव्यात केलेला आहे. ही कथा जैन कथासाहित्याचेच एक अंग मानली जाते. विद्वान लेखकांनी जैन कथा संस्कृत, प्राकृत तथा उपभ्रंश इत्यादि भाषामधून लिहून एकीकडे या विविध भाषांची समृध्दि केली आहे तर, दुसरीकडे लोकांची भावना या साहित्याकडे अधिक आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक जैन लेखकांनी आपले कथासाहित्य बोली भाषेतून७ लिहिलेले आहे. या कथामधून जैन संस्कृती व सभ्यता विविध रुपाने प्रकट झ ाली आहे. या कथामधून उपदेश करण्याचा प्रमुख हेतू असला तरी, मानवाच्या सुखदुःखात्मक भावनांचे चित्रण देखील सुंदर प्रकारे रेखाटले आहे. जैन आचार्यांनी या कथामध्यमाद्वारे अति गहन सैध्दांतिक तत्वांना सुलभ बनविले आहे. श्रावक तथा सर्वसाधारण लोकांनी या कथांच्याद्वारे स्वतःचे जीवन अधिक शुध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ.यादव यांच्या मतानुसारजैनकथासाहित्य बोध्दकथासाहित्यापेक्षा अधिक उपयुक्त व सफल ठरले आहे. जैन कथेत तीर्थंकर, श्रमण तसेच शलाकापुरुष यांचे चरित्रचित्रण करण्यात आलेच आहे. परंतु त्याबरोबरच जैन धार्मिक दृष्टी अधिक पुष्ट करण्यासाठी कथा समाप्तीच्या वेळी 'केवली' द्वारा सुखदुःखाची व्याख्या करुन पूर्वजन्मानुसार कर्मफलप्राप्ति होत असल्याचे कथन केले आहे. या उलट बौध्दजातकात रुपक कथा अधिक असून जैनकथेप्रमाणे जीवनावश्यक गोष्टीचे वर्णन तितक्या प्रखरतेने आढळून येत नाही. संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या वेगवेगळ्या भाषेत विधि विद्वानांनी केलेली कथारचना फारच सुंदर आहे. अपभ्रंशमधील पउमचरिउ व भविस्सयत्त कहा नावाचे ग्रंथ कथासात्यिाचे अमूल्य असे भांडार आहेत. यात अनेक उपदोपर कथा असून त्यातून जैन धर्माचा व तत्वांचा देखील प्रचार करण्यात आला आहे.

जैन कथासाहित्यातील कथानक अतिशय हृदयस्पर्शी असून व्यापक आहे. जीवनातील शाश्वत तत्वांचा तथा मूल्यांचा विचार त्यातून केला आहे. पात्रांची चरित्रे स्वाभाविक असून सर्वग्राही आहेत. त्यातील कथोपकथन पात्रांना अनुकूल असे आहे. त्यातील वातावरणामुळे कथेच्या पूर्वस्वरुपाला उत्कटता प्राप्त झाली आहे. या कथासाहित्यातून तत्कालीन धार्मिक, सामाजिक व ऐतिहासिक गोष्टींचे चित्रण वाचकासमोर ठेवण्यात आले आहे. शैलीत सरळता व सरसता आहे. तरीसुध्दा जैन लेखकांनी आपल्या कथेतून आध्यात्मिकतेला अधिक प्राधान्य दिले आहे. एकीकडे त्याग, साधना, वैराग्य यांच्याबरोबरच दुसरीकडे मनुष्य जीवनातील व्यवहारिक बाबींनाही महत्व देऊन आध्यात्मिकता व भौतिकता यांचे स्पष्टीकरण केले आहे. काही ठिकाणी

जैन संस्कृतीचे दर्शन घडावे म्हणून कर्माचे फल, पुनर्जन्म, आत्मशुध्दि, तपश्चर्या यांच्य साह्याने मनुष्याला श्रेष्ठपद कसे प्राप्त होते ते दाखविले आहे. अनादि कालापासून संसार भ्रमण करणाऱ्या मानवाची आत्मसाधना केवळ एका भवामध्ये पूर्ण होत नाही. त्यासाठी त्याला अनेक जन्म घ्यावे लागतात. तपाचरणाने त्याची कर्मनिर्जरा होते. या सर्व गोष्टींचे विवेचन जैनकथा साहित्यात पदोपदी आढळते. कथा मनोरंजक होण्यासाठी त्यामध्ये अनेक प्रकारचे संवाद, बुध्दिपरीक्षा, वाक्प्रचार, म्हणी समस्यापूर्ती इत्यादींचा उपयोग केला आहे.

**जैन कथांचे वर्गीकरण-**

जैन कथासाहित्याचे भांडार अति विशाल आहे. त्यामुळे याला निश्चित असे स्वरुप देणे कठीण आहे. तरीसुध्दा विव्दानांनी कथानके, पात्रे, तसेच उद्देश यानुसार कथांचे भेद सांगितले आहेत. कथा साहित्य विशारदांनी अभिप्रायानुसार त्यांना विभाजित केले आहे. दीर्घनिकायाच्या ब्रह्मजालसुत्तमध्ये एके ठिकाणी कथांचे विविध भेद सांगितले आहेत ते असे आहेत-

राजकथा, चोरकथा, सेनकथा, भयकथा, युध्दकथा, अन्नकथा, पानकथा, वस्त्रकथा, गंधकथा, ज्ञातिकथा, यानकथा, ग्रामकथा, नगरकथा, निरर्थककथा, लोकाख्यायिका, समुद्राख्यायिका इत्यादि.

आगमसाहित्यातील ज्ञाताधर्मकथा, उत्तराध्ययनसूत्र, वसुदेव हिंडी या ग्रंथातूनही प्राकृतकथा प्रकारांची माहिती मिळते.

वसुदेवहिंडी ग्रंथात कथा दोन प्रकारची सांगितली आहे. १. चरितकथा, २. कल्पितकथा. यातील चरितकथेचे पुरिसचरिय व इत्थिचरिय असे पुनः दोन प्रकार केले आहे.

देसवेयालिय निज्जुतीमध्ये कथेचे अर्थकथा, कामकथा, धर्मकथा व मिश्रितकथा असे चार प्रकार सांगून पुनः प्रत्येकाची चर्चा निर्युक्तीत आढळते. यातील धर्मकथेचे पुनः अक्खेवणी, निक्खेवणी, संवेयणी, गिव्वेयणी इत्यादि प्रकार सांगितले आहेत.

हरिभद्रसूरि विरचित समराइच्चकहामध्ये दिव्य, दिव्यमाणुसी व माणुसी हे कथेचे मुख्य तीन प्रकार सांगितले आहेत. त्याशिवाय धर्म, अर्थ, काम व संकीर्ण हेही कथेचे प्रकार सांगितले आहेत.

उद्योत्तनसूरि विरचित कुवलयमाला या चंपूकाव्यात कथेचे सकलकथा, खंडकथा, उल्लापकथा, परिहासकथा व वराकथा असे पाच प्रकार पाडले आहेत. देवेंद्रसूरींनी रात्रीकथा, स्त्रीकथा, भक्तकथा,

जनपदकथा व धर्मकथा असे प्रकार सांगून धर्मकथा हाच प्रकार सर्वश्रेष्ठ असल्याचे सांगितले आहेत. धर्मकथा, नीतिकथा व अद्‌भूतकथा असे कथेचे परंपरागत तीन प्रकार मानले आहेत. प्राकृत व्याकरणकार हेमचंद्र यांच्या मते कथेचे उपाख्यान, आख्यान, निदर्शन, पवन्हिका, मंथालिका, मणिकुल्या, परिकथा, खंडकथा, सकलकथा, उपकथा व बृहत्कथा असे विविध प्रकार सांगितले आहेत.

साधारणपणे जैन कथांचे विभाजन खालील चार प्रकारात केले आहे-

१. धर्मविषयक कथा, २. अर्थविषयक कथा, ३. कामविषयक कथा, ४. मोक्षविषयक कथा.

यातील मोक्षविषयक भावना सर्वत्र असल्याची दिसते. या भावनेच्या अंतर्गतच विरक्ति, त्याग, तपस्या, पूजा इत्यादि धार्मिक गोष्टिंचा समावेश झाला आहे. कारण जैन कथांचे प्रमुख ध्येय जैनधर्माचा महिमा वर्णन करणे, तसेच जैन आचारांचा प्रचार करणे हेच आहे.

प्रकारानुसार जैन कथांचे वर्गीकरण आपणाला पुढीलप्रमाणे करता येईल- १. धार्मिक २. ऐतिहासिक ३. सामाजिक ४. उपदेशात्मक ५. मनोरंजनात्मक ६. अलौकिक ७. नैतिक ८. शाप व उःशापविषयक ९.व्यवसायविषयक १०. मात्राविषयक ११. गुरु-शिष्यविषयक १२. देवदेवतासंबंधी १३. बुध्दिपरीक्षाविषयक १४.न्याय विषयक १५. काल्पनिक १६. विविध १७. प्रकीर्णक इत्यादि

प्रस्तुत ठिकाणी प्राकृत, संस्कृत, अपभ्रंश भाषेमध्ये प्रसिध्द तथा महत्वाच्या असलेल्या कथाग्रंथाची माहिती देण्यात आली आहे.

## प्राकृत कथा ग्रंथ

प्राकृत कथासाहित्य हे अतिसमृध्द असून हितोपदेशाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. ९ व्या शतकापूर्वी हे कथासाहित्य अधिक प्रमाणात लिहिलेले दिसून येत नाही. पूर्ववर्ती जैनाचार्यांनी लिहिलेल्या प्राकृत कथाग्रंथाची संख्या अगदी त्रोटक होती. तत्काली पउमचरिउ, हरिवंसचरिउ, तरंगवती, तरंगलीला,

वसुदवहिंडी, समराइच्चकहा, कुवलयमाला, चउपन्नमहापुरिस इत्यादि चरित्रात्मक कथा साहित्याची निर्मिती केलेली दिसून येते. उपदेश कथाग्रंथात उपदेश पद, उपदेशमाला, धर्मोपदेशमाला या ग्रंथाची निर्मिती झाली. परंतु ११-१२ शतकामध्ये श्वेतांबर संप्रदायातील विव्दानांनी पुढाकार घेऊन अनेक कथाग्रंथाची निर्मिती केली. त्याचे प्रमुख कारण म्हणजे

पान नं. ३०९ वरुन
'तत्कालीन' गुजराथमधील चालुक्य, मालवामधील परमार, राजस्थानातील गुहिलोत व चौहान राजांनी जैन धर्माविषयी आपले विशेष प्रेम प्रकट केलेले दिसून येते.' हेमचंद्र, हरिभद्र यांच्यासारखे महान लेखक होऊन गेले. या विविध विद्वानांनी कथासाहित्यात अत्यंत मोलाची भर घातली. या प्राकृत कथासाहित्यातील काही महत्वाच्या कथाग्रंथाची माहिती येथे देण्यात आली.

**१) तरंगवइकहा-** या ग्रंथाची रचना सुप्रसिध्द जैन विद्वान पादलिप्तसूरि यांनी करुन प्राकृत कथासाहित्यात एका नवीन परंपरेला जन्म दिलेला दिसून येतो. प्राकृत कथासाहित्यातील ही सर्वात प्राचीन कथा मानली जाते. दुर्देवाने हा ग्रंथ अद्याप उपलब्ध होऊ शकला नाही. तरंगवती या धर्मकथेबरोबरच मलयवती आणि मगधसेना या दोन कथांचा उल्लेख करण्यात आलेला दिसून येतो. दशवैकालिकचूर्णि व जिनभद्रगणीच्या विशेषावश्यकभाषात तसेच उद्योतनसूरीच्या कुवलयमाला ग्रंथात, धनपाललिखित तिलमंजरीत, लक्ष्मणगणीच्या सुपसानाहचरिय वगैरे ग्रंथातून या कथेविषयीचा उल्लेख आपणाला मिळतो. प्रोफेसर लॉयमन यांच्यामते या कथेचा काळ इ. स. २-३ रे शतक मानला जातो.

**२) तरंगलीला-** सुप्रसिध्द जैन विद्वान नेमिचंद्रगणि यांची ही श्रेष्ठ कलाकृती आहे. तरंगवतीकथेचे संक्षिप्तरुप तरंगलील या कथेत सांगितलेले आहे. तरंगवती कथेनंतर सुमारे १००० वर्षांनी या ग्रंथाची रचना झ ाली. यात एकूण १६४२ इतक्या गाथा आहेत. या कथेत तरंगवतीची प्रेमावस्था अत्यंत सुदंर रीतीने वर्णिली आहे. ही तरंगवती कथा वाक्यप्रचार-प्रचुर, अतिविशाल व वैचित्र्यपुर्ण आहे. त्यात सुंदर, कुलक, गहन युगल व दुर्बोध षट्कलांचा वापर करण्यात आला आहे. ही कथा शृंगाररसाने परिपूर्ण असून भाषाशैली प्रवाहपूर्ण व साहित्यिक आहे. प्रस्तुत कथाग्रंथ अनुवादित व प्रकाशित झाला आहे.

**३) धूर्ताख्यान-** धूर्ताख्यान ही आचार्य हरिभद्रसूरीची एक उल्ल्ेखनीय रचना असून तिची विभागणी ५ आख्यानामध्ये करण्यात आली आहे. त्यातील एकूण गाथांची संख्या ४८५ इतकी आहे. लेखकान रामायण, महाभारत व पुराणातील अतिरंजित कथांवर व्यंग करण्यासाठी म्हणून प्रस्तुत ग्रंथाच रचना केली आहे. हास्य व व्यंग यांनी परिपर्ण अशी ही रचना आहे. म्हणूनच या कथेला भारतीय साहित्यतील उपहासक काव्य विभागातील अद्वितीय रत्न म्हटले आहे. या कथेत धूर्तांनी सांगितलेलया उपहासात्मक कथा आहेत. याला अनुसरुनच धर्मपरीक्षा नावाच्या ग्रंथाची रचना झालेली दिसते. हरिभद्रसूरिकृत धूर्ताख्यान कथाग्रंथ ही एक अद्वितीय कलाकृती मानली जाते.

**४) सुरसुंदरीचरिउ-** या कथाग्रंथाची रचना धनेश्वरसूरी यांनी केली असून ते जिनेश्वरसूरीचे शिष्य होते. या प्राकृत कथाकाव्यात प्रत्येकी २५० प्रमाणे १६ परिच्छेद असून एकूण ४००० गाथा आहेत. यात नरवाहदत्त राजाची कन्या सुरसुंदरी व विद्याधर यांच्या प्रेमाची कथा सुंदररीत्या गुंफली आहे. मानसिक स्थितीचे वर्णन वातावरणनिर्मिती स्वाभाविक वर्णन ही तिची खास वैशिष्टये आहेत. टीकाकारांच्या मते ही एक सर्वगुणसंपन्न अशी कथा आहे. धर्म, अहिंसा, सत्य संन्यास या विषयांचा देखील उल्लेख आहे. सुख, दुःख, नरक, स्वर्ग, संसार यांच्याविषयीची सुंदर सुभाषिते आहेत. प्रसाद गुणप्रधान असून संस्कृत, अपभ्रंशमधील ग्राम्य शब्दही आहेत. मुख्य कथानकाबरोबर अनेक उपकथानकांचीही रचना करण्यात आली आहे. काही काही ठिकाणी  विविध छेदांचा वापर केला असून कथानक सुरस बनविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. रचनाशैली मृदु, भावरसाने परिपूर्ण अशी आहे. या कथेत विविध नैसगिक दृश्ये, पुनर्जन्म, विवाह, उत्सव, प्रातःकाल, सांयकल, वन-उद्यान, सरोवर इत्यादींची सुदंर चित्रणे रेखाटली आहेत. हरिभद्रसूरींच्या धूर्ताख्यान कथेचा प्रभाव सुरसुंदरीचरिउ या कथेवर पडलेला दिसून येतो. विविध भाषावैशिष्ठयांच्या दृष्टीने हे कथाग्रंथ महत्वाचा असा आहे.

पान नं. ३१० वरुन

**५) णाणपंचमीकहा-** या प्राकृत कथाग्रंथाची रचना महेश्वरसूरि यांनी इ. स. १०५२ च्या सुमारास केली असावी. या कथाग्रंथात जयसेन, नंद, भद्रा, वीर, कमल, गुणानुराग, विमल, धरण देवी व भविष्यदत्त यांच्या स्वतंत्र अशा १० कथा आहेत. सर्व कथागाथांची संख्या २००० इतकी आहे. या दहाही कथा प्रामुख्याने ज्ञानपंचमी व्रताचे महात्म्य दाखविण्यासाठी लिहिल्या आहेत. या कथातून विविध रस भाव व लोकोक्तींचा वापर केला असून कथामधी वर्णन सुंदर, सरळ, प्रवाही व हृदयंगम झाले आहे.

**६) सिरिसिरीवालकहा-** या कथेचा मुख्य उद्देश म्हणजे सिध्दचक्रपूजेचे महात्म्य वर्णन करणे हा होय. राजकुमार श्रीपालाच्या विवाहाविषयीचे यात वर्णन करण्यात आले आहे. कथेतील कथनशैली सरळ, सुंदर व सुरस आहे. काही ठिकाणी समासयुक्त शैलीचा वापर करण्यात आला आहे. प्रामुख्याने महाराष्ट्री प्राकृत भाषेचा यात वार केला असून मधून मधून अपभ्रंशाचाही वापर करण्यात आला आहे. या ग्रंथाची रचना रत्नशेखरसूरीने केली आहे.

**७) कुमारपाचरित** - हेमचंद्रचरित या कथाग्रंथाची रचना १२ व्या शतकात करण्यात आली आहे. हा ग्रंथ एकूण आठ सर्गामध्ये विभाजित करण्यात आला आहे. चालुक्यवंशी गुजराथचा राजा कुमारपाल याच्या प्रेरणेने हेमचंद्रांनी अनेक ग्रंथ कृतीची रचना केली आहे. शब्दानुशासन या ग्रंथाबरोबरच या ग्रंथाचीही रचना

करण्यात आली आहे. कथेच्य दृष्टीने पहिल्या सर्गात अनहिलपुरचे कुमारपाल राजाचय प्रभातकालीन दिनचर्येचे वर्णन असून त्यानंतर राजाचा व्यायाम, गजारोहण, जिनमंदिरामगम, पूजन, गृहागमन वगैरेंचे वर्णन केले आहे. याशिवाय उद्यानक्रीडा, ग्रीष्म, वर्षा, हेमंत, शिशिर या ऋतूंचे वर्णन, चंद्रोदय, राजांचे स्वप्न, परमार्थ चिंतन वगैरे अनेक गोष्टींचे वर्णन केले आहे. या कथाग्रंथात तसे पाहता कथाभाग विशेष प्रकर्षाने आलेला जाणवत नाही. काही ठिकाणी व्याकरण वर्णनामुळे कृत्रिमता देखील आलेली दिसून येते.

**८) महीवालकहा-** या ग्रंथाचा रचनाकाल सुमारे १२ वे शतक असून याची रचना वीरदेवगणींनी केली आहे. वीरदेवगणी हे मुनिचंद्रसूरींचे शिष्य होत. या कवीने स्वतःला पंडिततिलक म्हणून संबोधिले आहे. या ग्रंथाचे संस्कृत रुपांतर चरित्रसुंदर याने महीपालचरिउ या नावाने केले आहे. आपी सेवा न करणाऱ्या खुशालचेंडूप्रमाणे असलेल्या या महिपालाची हकापट्टी उज्जैनी राजा नरसिंह याने कशी केली, पुढे महिपालाने देशोदेशी भ्रमण करीत, संकटांना तोंड देत खूप संपत्ती कशी मिळविली व राजा तथा महिपालाने कशी दीक्षा ग्रहण केली याचे यात सुंदररीत्या वर्णन केले आहे. य कथाग्रंथातील भाषा अगदी सरळ व ओघवती आहे. कथेत पूर्णतः गाथाछंदाचा वापर आहे. उपाख्यानांनी कथा परिपूर्ण झाली आहे.

९) **सुदंसणचरिय-** या कथेत एकूण १६ उद्देश असून एकूण गाथांची संख्या ४००२ इतकी आहे. त्यात धनपाल, सुदर्शन, विजयकुमार, शीलवती, अश्वाबोध, भ्राता, धात्रीसुत व धात्री असे आठ अधिकार आहेत. या कथेत प्रसंगानुरुप स्त्री-पुरुषांची वर्णने तथा वृतांत आले आहेत. या रचनेचे कर्ते देवेंद्रसूरि असून त्यांनी आपले रचनाचातुर्य ठिकाटिकाणी प्रकट केले आहे. धनपालाने नेमिश्वराची स्तुति प्रथम संस्कृतमध्ये केली आहे. या ग्रंथात उपदेशात्मक सुभाषिते व उपमादि अलंकारांचे प्रमाण अधिक आढळते.

**१०) कृष्णचरित्र-** देवेंद्रसूरीने लिहिलेल्या या कथाग्रंथात एूकण ११६३ इतक्या गाथा आहेत. यात असुदेवाच्या पूर्वभवाचे प्रथम वर्णन केले असून नतर क्रमशः वसुदेवाचा जन्म, भ्रमण, कृष्णजन्म, कंसवध, द्वारकावर्णन, प्रद्युम्नहरण, पांडव-द्रौपदी, जरासंधयुध्द, नेमिनाथचरित्र, द्रौपदीहरण, बलदेवीदीक्षा, नेमिनिर्वाण व कृष्णाचे भावी तीर्थकरत्व यांचे वर्णन केले आहे. या कथाग्रंथ रचनेसाठी वसुदेवहिंडी व जिनसेनकृत हरिवंशपुराण या ग्रंथाचा आधार घेतलेला दिसतो.

पान नं. ३११ वरुन

११) **निर्वाण लीलावती-** हा कथाग्रंथ जिनेश्वरसूरींनी लिहिला असून त्यचा काळ सन १०२५ ते १०३८ इतका मानला जातो. हा कथाग्रंथ प्राकृत पद्य कथाग्रंथातील एक प्रमुख ग्रंथ मानला जातो. पदलालित्य, श्लेष, अलंकार यांनी या ग्रंथातील भाषा विभूषित झाली आहे. भाषाशैली प्रसादपूर्ण असून ती अलंकारप्रधान असल्याचीही ग्वाही देण्यात आली आहे. या ग्रंथाच्या प्रति दुर्मिळ आहेत. याचे जिनरत्न यानें संस्कृत रुपांतर देखील केले आहे.

१२) ज्ञानपंचमीकथा- जैन महाराष्ट्री प्राकृतमधील हा एक सुंदर ग्रंथ असून त्याची रचना महेश्वरसूरि यांनी केली आहे. यात जिनसेनकहा, नंदकहा, वीरकहा, कमलकहा, विमलकहा, धरणकहा इत्यादि १० कथा

आहेत. यातील गाथांची संख्या २००४ इतकी आहे. या ग्रंथातील महेश्वराची वर्णनशैली सरळ, सुंदर व भावपूा आहे.

चंपूकथाग्रंथ-

वरील प्राकृत पद्य कथा ग्रंथाशिवाय आपणाला गद्य-पद्य मिश्रशैलीने युक्त असलेले कांही ग्रंथ पहावयास मिळतात. याच शैलीला सर्वसाधारण चंपूशैली असे संबोधिले आहे. चंपूशैली ही जैन आचार्यांची जैन साहित्याला मिळालेली एक महान देणगी आहे.अशा चंपूकथा ग्रंथामध्ये आपणाला वसुदेवहिंडी समराइच्चकथा, कुवलयमाला, कालकाचार्यांची कथा, जिनदत्ताख्यान, मलयसुंदरी, नर्मदासुंदरी वगैरे कृतींचा समावेश करता येईल.

**१) वसुदेवहिंडी-** वसुदेवहिंडी ही एक बृहद्‌कथा असून जर्मन विद्वान अल्सडोर्फ यांनी ग्रंथाची तुलना गुणाढयाच्या बृहद्‌कथेशी केली आहे. या ग्रंथात कृष्णपिता वसुदेव याच्या भ्रमणाचे वर्णन केले असून हरिवंशाची प्रशंसा केली आहे. हा ग्रंथ अधिकांश गद्यात लिहिला असून पद्याचाही त्यात समावेश आहे. या ग्रंथाची भाषा महाराष्ट्री प्राकृत आहे. या ग्रंथाचा पूर्वभाग संघदासगणी व उत्तरभाग धर्मसेनगणी यांनी लिहिला आहे. या कथेचा उल्लेख जिनभद्र, हरिभद्र, मलयगिरी यांनी केली आहे. या ग्रंथाचे प्रमुख दोन खंड आहेत. प्रथम खंडात २९ लंभक असून ११००० श्लोक आहेत व दुसऱ्या खंडात ७१ लंभक असून १७००० इतके श्लोक आहेत. या ग्रंथाची भाषा सरळ स्वाभाविक व प्रसादगुणाने युक्त आहे. त्यातील संवाद मनोवेधक आहेत. यातील महाराष्ट्री प्राकृत भाषेची तुलना चूर्णी ग्रंथाशी केली जाते. यात अनेक देशी शब्दांचा भरणा असून उपकथानकेही आहेत. तीर्थकरांबरोबरच अन्य शलाका पुरुषांचेही वर्णन केले आहे. त्यातील एक विष्णुगीतिका पहाण्यासारखी आहे.

उवसम साहुवरिट्ठया ! न हु कोवो वण्णिओ जिणिंदेहिं । हुंति हु कोवणसीलया, पावंती बहूणि जइयव्वाहं ॥

२. **समराइच्चकथा-** संस्कृत-प्राकृतमधील महान विद्वान व याकिनीमहत्तरापुत्र हरिभद्रसूरि यांनी या ग्रंथाची रचना केली असून प्राकृत कथासाहित्यातील हा अत्यंत नावाजलेला असा ग्रंथ आहे. हे महान भडिमार असून आपापल्या कृतकर्मानुसार चांगली अथवा हीन गति कशी प्राप्त होते याचे सुंदर विवेचन केले आहे. या कथेला कवीने दिव्यमाणुसी कथा म्हटले आहे. यात विविध नायक-नायिका यांच्य प्रेमकथा असून त्यांच्या चरित्राचे वर्णन केले आहे. मधून मधून अनेक धार्मिक कथा सांगण्यात आल्या आहेत. पुनर्जन्म सिध्दांताचे समर्थने केले आहे. भाषा महाराष्ट्री प्राकृत असून देखील ठिकठिक ाणी शौरसेनीचा वापर करण्यात आला आहे. याचा पद्यभाग आर्या छंदात असून द्विपदी विपुला या छंदांचाही वापर आहे. भाषा सरळ व प्रवाही आहे. काही ठिकाणी वर्णन करीत असताना लांबलचक समास शैलीचा वापर केला आहे. प्रश्नोत्तर शैलीदेखील वापरली आहे. काव्यकौशल्याच्या दृष्टीने हा अनुपम असा ग्रंथ आहे.

पान नं. ३१२ वरुन

**३) कुवलयमाला** - या चंपूकाव्यकथेचा कर्ता दाक्षिण्यचिन्ह उद्योतनसूरि असून या ग्रंथाची रचना इ. स. ७७६ ला जालोर येथे करण्यात आली. कवलयमालेचय वैशिष्ठयपूर्ण जीवन चरित्राने गुंफलेली ही सुंदर कथा असून तिच्यात उपाख्याने, सामाजिक व वैयक्तिक स्वभाव चित्रणे रेखाटलेली आहेत. क्रोध, मान, माया, लोभ व मोह या कषायांचे स्वरुप कथाच्या साह्याने सांगून त्यांचा परिणाम कथन केला आहे. या ग्रंथात महाराष्ट्री प्राकृत भाषेचा वापर अधिक प्रमाणात केला असून अपभ्रंश, संस्कृत पैशाची या भाषांचाही त्यात समावेश आहे. उद्योतनसूरने देशोदेशी भ्रमण केले असल्यामुळे त्या देशातील भाषा, लोक, त्यांचे स्वभाव, रीति-रिवाज, रुढी, परंपरा, धार्मिक भावना, आर्थिक अवस्था, सामाजिक जीवन यांचे सुंदररीत्या चित्रण रेखाटले आहे. प्रस्तुत कलाकृति प्रेम, शृंगार, विविध वर्णने, अलंकार, सुभाषिते, प्रश्नोत्तर, प्रहेलिका या विविध बाबींनी युक्त असून एतिहासिक माहितीच्या दृष्टीनेही हा ग्रंथ उपयुक्त आहे.

४) **जिनदत्ताख्यान-** या ग्रंथाच कर्ते सुमतिसूरि असून त्यांचा विशेष परिचय आपणाला मिळू शकत नाी. या कथाग्रंथाचा नायक जिनदत्त असून त्याच्या जीवनाविषयीची यात माहिती दिली आहे. प्रथम तो खुशालचेंडु असून पुढे विविध कुमारींशी त्याने विवाह करुन व सुखोपभोग भोगून पुढे दीक्षा कशी ग्रहण केली याचे वर्णन करण्यात आले आहे. गद्य-पद्यानी युक्त अशा या ग्रंथात अनेक साहित्यिक गुण आपणाला पाहावयास मिळतात.

जिनदत्ताख्यान नावाचा आणखी एक कथाग्रंथ आहे. परंतु त्याच्या कर्त्याविषयी आपणाला विशेष माहिती मिळत नाही. या ग्रंथातील कथानक वरील कथेप्रमाणेच आहे.

५. **रयणसेहरीकहा-** या ग्रंथाच्या जिनहर्षगणी या लेखकाने आपण स्वत: जयचंद्रमुनीचे शिष्य असून हा ग्रंथ चित्रकूट येथे लिहिल्याचे स्पष्ट केले आहे. या ग्रंथाची रचना बहुधा १५ व्या शतकाच्या पूर्वीच झाली असावी. ही कथा वार्षिक, चातुर्मासिक व चतुर्दशी तसेच अष्टमी इत्यादि पर्वातील अनुष्ठान दृष्टांतरुपाने स्पष्ट करण्यासाठी लिहिली आहे. यात रत्नावली ही नायिका असून तिच्या रुपसौंदर्याचे वर्णन सुंदररीत्या केले आहे. जिनहर्षगणी हे स्वत: संस्कृत प्राकृतमधील महान विद्वान असून या ग्रंथाची रचनाशैली प्रौढ असल्याचे दिसून येते. महान हिंदी कवि जायसी यांच्या पद्मावत महाकाव्याचा मूलाधार प्रस्तुत रयणसेहरीकहा हीच आहे.

६. **मलयसुंदरीकथा-** राजकुमार महाबल व मलयसुंदरी यांचे यात प्रेमाख्यान सांगितले असून त्यांच्या विरह-मिलनावस्थेचेही सुंदर वर्णन केले आहे. शेवटी या दोघांना वैराग्य कसे उत्पन्न होते याचे सुंदर विवेचन केले आहे. या ग्रंथकृतीच्या कर्त्याविषयी नक्की माहिती मिळू शकत नाही.

७. **नर्मदासुंदरीकथा-** नर्मदासुंदरीकथा ही एक धार्मिककथा आहे. तिची रचना महेंद्रसूरि यांनी इ. स. ११३० च्या दरम्यान केली आहे. यात गद्यपद्याचा समावेश असून पद्याची अधिकता आहे. यात महासती नर्मदासुंदरीच्या चरित्राचे सुंदर वर्णन केले असून अनेक संकटे आली असताना देखील तिने आपल्या शीलाचे

कसे रक्षण केले हे दाखवून दिले आहे. महेश्वरदत्त हा नर्मदासुंदरीचा पति असून, तिच्या चारित्र्याविषयी त्याला संशय येऊन तो तिचा कसा छळ करतो याचे अतिसुंदर वर्णन केले आहे. शेवटी ही सुंदरी दीक्षा घेऊन सर्व छळातून मुक्त होते. कथानकाची भाषाशैली अतिसुरस तथा रुचकर आहे. त्यात उपमादि अलंकारांचा वापर करुन प्रश्नोत्तर रुपाने कथा अधिक आकर्षक बनविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. याशिवाय आपणाला भुवनसुंदरी, मनोरमाचरित्र, धन्यसुंदरीकथा, नरदेवकथा इत्यदि चंपूशैली मिश्रित कथा पाहावयास मिळतात.

प्राकृत कथाकोष-

प्राकृत गद्य-पद्य कथासाहित्याप्रमाणेच काही प्राकृत कथाकोषांची देखील रचना करण्यात आली आहे. त्यांची रचना महान जैन विद्वांनांनी केली असून, भारतीय कथासहित्यातील ते अत्यंत मौलिक असे ग्रंथ मानले

पान नं. ३१३ वरुन

जातात. यात आपणाला आगमतील नायाधम्मकहाओ, उपदेशमाला प्रकरण, उपदेशपद, धर्मोपदेश-माला-विवरण कथाकोष प्रकरण, आख्यनमणिकोष, उपदेशरत्नकोष, भवभावना उपदेशमाला प्रकरण, कुमारपाल प्रतिबोध इत्यादि ग्रंथांचा अंतर्भाव करता येईल.

**१) नायाधम्मकहाओ-** प्रस्तुत ग्रंथ जैन आगम साहित्यातील एक प्राचीन ग्रंथ असून त्यात भ. महावीर कथित धर्मकथांचे संकलन करण्यात आले आहे. या ग्रंथाचे वैशिष्ठय असे की, एखाद्या गाथेत उपदेशात्मक तत्व सांगून दृंष्टांतरुपाने त्या तत्वाचे पालन करणा-या व्यक्तीचा जीवन वृंतात गद्य अथवा पद्यात विस्ताराने सांगितला आहे. हीच प्रणाली पाली भाषेतील जातकात आढळते. यातील तुंबकज्ञात, रोहिणीज्ञान, माकंदीपुत्रादि कथा अत्यंत लोकप्रिय अशा आहेत. विविध उदाहरणे, दृष्टांत लोकप्रचलित कथाद्वारे प्रभावात्मकरीत्या संयम, तप व त्याग यांचे वर्णन केले आहे. या ग्रंथात पुनरुक्तीचा एक महान दोष आढळतो. लांबलचक समासशैलीचाही अधिक वापर केला आहे. यात दीन श्रुतस्कंध असून, पहिल्यत १६ व दुसऱ्यात १० इतके अध्याय आहेत.

**२) उपदेशमाला -** मनमोहक व विविध पुष्पमालेप्रमाणे धर्मदासगणीने पूर्ववर्ती ऋषींच्या दृष्टांतपूर्वक जिनवचनाचे तथा उपदेशाचे संकलन या उपदेशमाला ग्रंथात संकलित केले आहे. या कथेला वैराग्यप्रधान कथा मानले आहे. यात एकूण ५४४ इतक्या गाथा असून त्यात विनय, शील, व्रत, संयम, दया, ज्ञान, ध्यान इत्यादि विषयानुरुप अनेक स्त्री-पुरुषांचे दृष्टांत दिले आहेत. स्वतःग्रंथ्काराने या कृतीला शांतिदायिनी, कल्याणकारी, मंगलकारी या विशेषणांनी संबोधिले आहे. या ग्रंथाची रचना सुमारे ४-५ शतकात झाली असावी, या ग्रंथावर जयसिंह, सिध्दर्षि आणि रत्नप्रभसूरि यांनी टीका लिहिल्या आहेत.

३) **उपदेशपद-** ही प्रख्यात विद्वान आचार्य हरिभद्रसूरींची रचना असून ती इ. स. ८ व्या शतकातील आहे. ही कथा साहित्याचे एक अनुपम भांडार म्हणून ओळखली जाते. मंदबुध्दिजनांना हितोपदेश करण्यासाठी त्यात अनेक लौकिक कथांचे संकलन केले आहे. यात १०३९ गाथा असून, त्या आर्या छंदात आहेत. या ग्रंथावर मुनिचंद्रसूरि (१२ वे शतक) यांची सुखबोधिनी टीका असून, वर्धमान रचित एक वृत्ति आहे.

४) **धर्मोपदेशमाला विवरण**- कृष्णमुनि शिष्य जयसिंहसूरि यांची ही रचना असून ती इ. स. ८५८ च्या दरम्यान लिहिली आहे. यात एकूण ९८ गाथा असून त्यात १५६ इतक्या कथा आहेत. या ग्रंथात दान, शील यांचे माहात्म्य, रागद्वेषादींचे वाईट परिणाम, विकारांचे दुष्परिणाम, त्याचबरोबर चोरी, जुगार, मद्यपान यांचे वर्णन करुन समाजाच्या सर्व थरातील व्यक्तींचे दर्शन घडविले आहे. विविध देश, मंदिरे, नद्या, सरोवरे, यांचेही वर्णन केले असून वक्रोक्ति, व्याजोक्ति, गूढोक्ति यांची प्रसंगानुरुप उदाहरणे दिली आहेत. तत्कालीन समाज दर्शनाच्या दृष्टीने या ग्रंथाचे मूल्य अधिक आहे.

५) **शीलोपदेशमाला** - जयसिंहसूरींचे शिष्य जयकीर्ति यांनी याची रचन केली असून, त्यात एकूण ११६ गाथा आहेत. त्यात शील अर्थात ब्रह्मचर्याच्या पालनाविषयीचा उपदेश दिला आहे. यावर संघतिलकशिष्य सोमतिलकसूरिने शीलतरंगिणी, विद्यातिलक व पुण्यकीर्ति यांनी वृत्तींची रचना केली आहे.

६) **भवभावना-** या प्रस्तुत कथाग्रंथाची रचना मलधारि हेमचंद्रसूरि यांनी केली. त्यांच्या वस्त्रांच्या मलिनतेवरुन त्यांचे हे नाव पडले. ते एक प्रसिध्द विद्वान पंडित होते. ते अभयदेवाचे शिष्य होते. भवभावना विषयीच्या १२ भावनांचे अध्ययन १२ दिवसात केले जात असल्याचे म्हटले आहे. यत एकूण ५३१ गाथा असून त्यात या १२ भावनांचेच वर्णन आहे. यातील विवरणात धार्मिक, लौकिक कथा देखील गुंफल्या आहेत. यातील विविध चित्रणे अतिशय स्वाभाविक व सुंदर आहेत. प्रामुख्याने नेमिनाथांच्या चरित्राचे त्यात वर्णन केले आहे.

पान नं. ३१४ वरुन

**७) कथाकोषप्रकरण-** हि आचार्य जिनेश्वरसूरींची रचना असून ते प्रसिध्द श्वेतांबर आचार्य होते. या ग्रंथाची रचना त्यांनी सन १०५२ मध्ये केली असून त्यांचा उल्लेख धनेश्वर, गुणचंद्र, अभयदेवसूरि यांनी केला आहे. ते संस्कृत प्राकृतमधील गाढे विद्वान असून, त्यांनी पंचलिंगीप्रकरण व निर्वाण लीलावतीकथा या कृतींची रचना केली आहे. यात ३० गाथा असून त्यांच्याद्वारे जिनपूजा, साधुदान, जैनधर्म यांचे महत्व विशद केले आहे. तत्कालीन समाजातील आचार-विचार राजनीति यांचेही सुंदर वर्णन केले आहे. कथांची भाषा सरळ बोधगम्य असून, त्यात समासपदावली, शब्दावडंबर तथा अलंकाराचा वापर नाही.

**८) कथारत्नकोष-** प्रसन्नचंद्राचे शिष्य देवभद्र यांनी हा ग्रंथ लिहिला असून, त्यात मुक्तिमार्गविषयक कथा आहेत. तो प्राकृतात असून मधून संस्कृत पद्यांचा वापर केला आहे. गृहस्थांची कर्तव्ये अत्यंत कुशलतेने यात सांगितली आहेत.

**९) कथाकोष (भरतेश्वर बाहुबलि-वृत्ति)-** यात प्राचीन जैन साहित्यात उल्लेखिलेल्या महापुरुषांच्या जीवनकथा प्राकृतमध्ये दिल्या आहेत. यत संस्कृतचाही वापर असून ती रचना सुमारे वि. सं. १५०६ मधील आहे.

**१०) आख्यानमणिकोष-** आख्यानमणिकोष या ग्रंथाला कथामणिकोष या दुसऱ्या नावानेही संबोधिले आहे. याचे लेखक श्रीदेवेंद्रमणि असून ती प्राकृतातील पद्यरचना आहे. यात एकूण ४१ अध्याय आहेत. ग्रंथकर्त्याची लेखनशैली सरळ व सुबोध आहे.

**११) कुमारपालप्रतिबोध-** सोमप्रभूरिरिचित हा कथाग्रंथ कथासहित्याच्य दृष्टीने अत्यंत महत्वाचा समजला जातो. कुमारपालचे मन जैन धर्माकडे वळवून य धर्माचे महत्म्य वर्णन करण्याच्या प्रयत्न यात केला आह. जैन धर्म उचित, पवित्र व अहिंसात्मक वाटून त्याने त्याचा स्वीकर केलेला दिसतो. यात ५ महाव्रते, गुरुपूजा, कर्तव्यपालन, गृहस्थांची व्रते यासंबंधी माहिती दिली आहे. दृष्टांतरुपान यात ५८ कथा सांगितल्या आहेतृ यातील भाषाशैली सरळ सुबोध असून धर्मिकदृष्टया हा ग्रंथ महत्वाचा आहे.

या कथाकोष ग्रंथाशिवाय कथासमास, प्राकृत कथासंग्रह, वर्धमान देशना इत्यादि कथाकोष प्रसिध्द आहेत.

संस्कृत कथा साहित्य

प्रत्येक भाषेल एक भरभराटीचा तथा समृध्दीच काळ लाभलेला असतो. तो नाहीसा होताच तिची हळुहळू अधोगति होत जाते. गुप्त साम्राज्य कालामध्ये संस्कृतचा प्रभाव अधिकाधिक वाढू लागला व प्राकृत अध्ययनाच काळ कमी होऊ लागला. या काळात धर्मशास्त्र, पुराण दर्शन, व्याकरण, काव्य नाटक, ज्योतिष, वैद्य या विषयावर एकाहून एक सुंदर अशी संस्कृतरचना होऊ लागली. जैन आचार्यांनी देखील याच गोष्टीचे अनुकरण केले. सिध्दहर्षीने उपमितिभप्रपंच, धनपालने तिलकमंजरी, हेमचंद्राने त्रिषष्टिशलाकापुरुषचरित आणि हरिषेणाने बृहत्कथाकोषसारख्या संस्कृत कथा ग्रंथांची रचना केली. लक्ष्मीवल्लभादि विद्वानांनी प्राकृत कथांचा संस्कृतमध्ये अनुवाद केला. प्रमुख कथाग्रंथांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. **उपमितिभवप्रपंच कथा-** सिध्दर्षीने लिहिलेला संस्कृतमधील हा एक अत्यंत मौलिक असा ग्रंथ आहे. यात विविध धर्मकथा, नानाविध अवांतरकथा सांगितल्या आहेत. अनेक उपमांच्या साह्याने कथा अधिक रोचक बनविल्या आहेत. उदाहरणार्थ अनंतपूर व निवृत्तिपूर दोन नगरे असून त्यात कर्मपरिणाम हा राजा राहतो. त्याची कालपरिणती ही राणी असून त्याच नगरीत साधुसमागम आणि निष्पुण्यक इत्यादि अन्य संसारी व्यक्ति आहेत. या कथाग्रंथाची तुलना जॉन बायनच्या 'पिलिग्रिम्स प्रोग्रेस' या इंग्रजी ग्रंथाशी केली जाते. रुपकांच्या स्वरुपात

पान नं. ३१५ वरुन

धर्मवृध्दि, धर्ममार्गातील विविध संकटे यासंबंधीच्या कथा आहेत. खरोखरच कथासाहित्यातील हे एक अमूल्य असे रत्न आहे.

२. **तिलकमंजरी-** उपमितिभवप्रपंचा कथेनंतर संस्कृतमधील तिलकमंजरी कथेचा उल्लेख करण्यात येतो. या कथेची रचना धनपाल याने केली आहे. ग्रंथाचा रचनाकाला सुमारे इ. स. ९७० इतका मानला जातो. यात तिलकमंजरी विषयीची माहिती आहे. या कथाग्रंथाची भाषा सरळ, ओघवती, सुरस व ओजपूर्ण आहे.

३. **कथारत्नाकर-** हेमविजयगणि यांनी या ग्रंथाची रचना केली असून, त्याचा रचनाकाल इ. स. १६५७ मानला जातो. यातील काही कथा काल्पनिक आहेत. ही कृति संस्कृतमध्ये असून नैतिकतेच्य दृष्टीने अत्यंत महत्वाची अशी आहे. यात संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, पुरातन हिंदी व प्राचीन गुजराथीमधील उध्दरणांचा समावेश आहे.

४. **रत्नचूडकथा**- या कथेत अनीतपूरचा अन्यायी राजा व दुर्बुध्दि मंत्री यांचा वृंत्तात आहे. त्या नगरीत चोर व धूर्त यांच्याशिवाय इतरांना स्थान नसल्याचे दिसून येते. धार्मिक व्यक्तींना मज्जाव होता. या मूळ कथानकात अनेक उपाख्यानांचा समावेश केला आहे. रोहक आपल्य विलक्षण बुध्दिचातुर्याने अवघड कार्य कसे सुलभ करतो याचे सुंदर विवेचन आहे. परदेशगमन करणाऱ्या रत्नचूड याला त्याच्या वडिलांनी दिलेला उपदेश देखील यत सुंदररीत्या ग्रथित केला आहे.

५. **व्रतकथाकोष-** हा ग्रंथ श्रुतसागर यांनी लिहिला आहे. यात व्रतविषयक कथांचे संकलन करण्यात आले आहे. ही ग्रंथरचना इ. स.१६ व्या शतकातील असावी.

६. **अघटकुमारकथा-** याची रचना जिनकीर्ति यांनी केली असून, चंपकश्रेष्टि कथानकाप्रमाणेच पथाच्या प्रयोगाने नायकाचा मृत्यू कसा टळू शकला याचे वर्णन आहे. याचा चार्लस क्राउस याने जर्मन अनुवद देखील केला आहे. याची दोन पद्यमय संस्करणे देखील आहेत. रचनाकालाविषयी निश्चित माहिती मिळत नसून अंदाजे रचनाकाल १५-१६ वे शतक असावा.

७. **कामघटकथा** - या कथेला 'पापबुध्दि-धर्मबुध्दि' य दुसऱ्या नावाने देखील संबोधिले आहे. याची रचना जयविजयशिष्य मानविजय यांनी केली आहे. यातील कथानक तथा पात्रादि उपमितिभवप्रपंचाप्रमाणेच आहेत. राजा व मंत्री मुनि उपदेशावरुन कसे जागृत होतात व दीक्षाग्रहण करतात याचे यात सुंदर विवेचन आहे.

या उपर्युक्त कथाग्रंथाच्याशिवाय अंबडचरित्र, पाल गोपाल कथानक, महाबलसुंदरीकथा, चंपकश्रेष्ठि कथानक इत्यादि संस्कृत कथा प्रसिध्द आहेत.

## संस्कृत कथाकोष-

संस्कृत कथाकोष हे कथासाहित्याचे महत्वाचे अंग असून अनेक लघुकथासंग्रहांचा त्यात समावेश करण्यात आल आहे. विविध स्त्री-पुरुषांची वर्णने केली आहेत. या विभागामध्ये आपणाला हरिषेणाचा कथाकोष, धर्मपरिक्षा, कथाकोष, अंतरकथासंग्रह, सम्यक्त्व कौमुदी यांचा समावेश करता येईल.

१. **कथाकोष** - हा कथाकोष एक अतिप्राचीन असा कथाग्रंथ मानलल जात असून, त्याची रचना हरिषेण यांनी शके ८५३ मध्ये केली आहे. हा कथाग्रंथ संपूर्ण संस्कृतमय आहे. यात एकूण १५७ कथा असून त्यात चाणक्य, शकटाल, भद्रबाहू, वररुची, स्वामि कार्तिकेय या ऐतिहासिक पुरुषांची चरित्रे वर्णिली आहेत. या ग्रंथात काही प्राकृत शब्दांचाही वापर करण्यात आला आहे. बहुधा हा ग्रंथ या लेखकाने एखाद्या प्राकृत ग्रंथावरुनच लिहिला असावा. स्वतः लेखकाने या कथाग्रंथाला आराधनोदधृत असे म्हटले आहे. आ. जिनसेनाप्रमाणेच हरिषेण पुन्नाट संघीय असून दोघांनाही आपली ग्रंथरचना वर्धमानपुरामध्ये केली असावी. या कथाग्रंथालाच ब्रहद् कथाकोष

पान नं. ३१६ वरुन

२. **धर्मपरीक्षा-** या ग्रंथाचा मूलाधार हरिभद्रसूरिकृत प्राकृत धूर्ताख्यान हा कथाग्रंथ असून त्याची रचना अमितगति यांनी केली आहे. या ग्रंथात स्वतंत्र अत्यंत मौलिक अशीही अनेक कथानके आहेत. अन्य धर्मातील पौराणिक कथांची असत्यता, कृत्रिमता, असंभावना तथा असंबध्दता दाखविण्याचे कार्य या कथेकडून करण्यात आले आहे. यात प्रामुख्याने मूर्खपणा व धूर्तपणा याविषयीची अनेक कथानके असून, सर्वात शेवटी खऱ्या धर्माची सत्यता पटवून देणे हाच मुख्य उद्देश आहे.

३. **कथाकोष, आराधनाकथाकोष, पुण्याश्रवकथाकोष-** या तिन्ही संस्कृत कथाग्रंथाची रचना अनुक्रमे प्रभाचंद्र, नेमिदत्त व रामचंद ममुक्षु यांनी केली आहे. कथाकोषात भद्रबाहू, चंद्रगुप्त, समंतभद्र, अकलंक यांची चरित्रे आहेत. नेमिचंद्रांचा आराधना-कथाकोष हा पद्यमय असून प्रभाचंद्राच्या ग्रंथाचेच विस्तृतीकरण आहे.

४. **कथासंगह (अंतरकथाकोष)-** याची रचना राजशेखर मलधारी यांनी केली आहे. आगम टीकाग्रंथांच्या आधारे याची रचना करण्यात आली आहे. यातील काही कथा सुरस व सुगम कथा संस्कृतमध्ये लिहिल्या गेल्या आहेत. या कथामधून संस्कृत, प्राकृत, अपभ्रंशमधील उध्दरणांचा समावेश आहे. कथा-उपकथा या रचना शैलीमुळे या ग्रंथाला अंतरकथाकोष असे म्हटले आहे. यातील आठ कथा फुल्ले याने इटालियन भाषेत अनुवादित केल्या असून, एका कथेचा अनुवाद 'जजमेंट ऑफ सालोमन' या नावाने टेसिटोरी याने केला आहे.

५. **सम्यक्त्व-कौमुदी-** हा लहान कथांचा कोष असून अर्हद्दास श्रेष्ठी स्वतःला सम्यक्त्वाची कशी प्राप्त झाली हे आपल्या आठ पत्नींना सांगत असतो. त्यानंतर त्या पत्नी आपापल्या अनुभव पतीला कथन करीत असतात. या संवादामध्ये विविध इतर कथानके गुंफली आहेत. या ग्रंथाच्या लेखकाविषयी निश्चित माहिती नसून सम्यक्त्व कौमुदी नावाचे अनेक ग्रंथ आहेत. त्यांचे जिनहर्षगणि, गुणाकरसूरि, मल्लिभूषण, सोमदेवसूरि, शुभचंद्र, वत्सराज, धर्मकीर्ति, मंगरस, वादिभूषण तथा यशःकीर्ति इत्यादि विविध लेखक आहेत.

६. **दान कल्पद्रुम-** याची रचना जिनकीर्ति यांनी केली आहे. या कथाग्रंथाचा रचनाकाला साधारणपणे १५ वे शतक मानला जातो. हा संस्कृत पद्यरुप ग्रंथ असून त्यात दानमहिमेचे वर्णन केले आहे. यात रोचक व विनोदपूर्ण लहान लहान कथांच संग्रह आहे. उदयधर्माने लिहिलेला धर्मकल्पद्रुम हा एक मध्यम कथाग्रंथ आहे.

या विवेचन केलेल्या संस्कृत कथाकोषाशिवाय आपणाल 'पंचशती प्रबोध' हा शुभशीलगणी यांचा ६०० धार्मिक कथान यक्त ग्रंथ आढळता.

## अपभ्रंश कथा साहित्य

अपभ्रंश कथा साहित्य समृध्द आहे. अपभ्रंश साहित्यात काव्यांची तथा प्रबंध काव्यांची रेलचेल अधिक असली तरी, त्यामानाने कथासाहित्य देखील अधिक संपन्न असल्याचे दिसते. कथा शब्दासठी अपभ्रंशमध्ये 'कहा' शब्दाचा वापर केलेला आढळून येतो. कथा हे साहित्याचे अविभाज्य अंग असून ते आबालवृध्दांच्या आवडीचे असते. काव्यसाहित्यापेक्षा कथासाहित्य अगोदर अस्तित्वात आल्याचे आपणाला दिसून येते. कथा या शब्दासठी पूर्वी 'आख्यान' या शब्दाच वापर केलेला आढळतो. आख्यान शब्दाचा सामान्य अर्थ 'वृत्त' अथवा 'विवरण' असा केला जातो. प्राकृत कथा साहित्य विभागात याविषयीचे अधिक विवेचन करण्यात आलेच आहे.

अपभ्रंश कथा साहित्याचे आपणाला तीन भागात विभाजन करता येईल. १. व्रतकथा तथा लघुकथा, २. बृहद्कथा, ३. कथाकाव्य.

अपभ्रंशमध्ये व्रतकथांची रचना अधिकाधिक झाली असून, या कथामधून धार्मिक माहात्म्य वर्णिल आहे. व्रताविषयीचे अधिक विवेचन करुन त्यांचेही माहात्म्य कथन करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ज्या कथातून

व्रतविषयक माहिति नाही, त्या कथा धार्मिक भावनांनी प्रेरित शुध्द उपदेशात्मक कथा असल्याच्या दिसून येतात. माणिकचंदरचित 'सत्तवसणकहा' एक अशी कथा आहे की, ज्या कथेमध्ये सात व्यसनांचे (जुगार, मदिरापान, वेश्यागमन, मांस भक्षण, चोरी, शिकार व परस्त्रीगमन) वर्णन केले असून, त्यांचा त्याग करण्यासाठी उपदेशरुपी कथादृष्टांताचे साह्य्य घेतले आहे. या कथा संधिबध्द व संधिमुक्त या दोन्ही शैलीत आहेत. व्रतकथा बहुधा अधिकाधिक दोन संधींनी युक्त असतात. काही कथा याला अपवादात्मकही असतात. ब्रह्म साधारणकृत कोकीलापंचमी, मुकुटसप्तमी, क्षीरद्वादशी, रविवासर, त्रिकालाचडबीसी, पुष्पांजली, निदुःखसप्तमी, निर्झरपंचमी या कथा ५ कडवकांनी युक्त आहेत. पं. रइधूकृत 'अणथमीकहा' चार कडवकांनी

युक्त आहे. याशिवाय हरिचंदाची अणथमीकहा, विमलकीर्तिची सुखवइविहाणकहा, सुयंधदहमीकहा, देवनंदिरचित रोहिणीविाणकहा, विनयचंद्रकृत णिज्झरपंचमीविहाणकहा इत्यादि कथा त्याहूनही मोठया असल्याच्या दिसतात.

बृहद्कथा साहित्य विभागात मोठया कथा रचनाकृतींचा समावेश केलेला दिसून येतो. या प्रकारात 'कथाकोष' या रचनेचा समावेश होत असून त्यात धार्मिक कथांचे संकलन करण्यात आले आहे. हा एक संग्रहात्मक ग्रंथ असून, काव्यरुपाने मुक्त आहे. श्रीचंद्रकृत 'कहाकोसु' ही रचना ५३ संधीनी युक्त असून तो एक कथांचाच कोष आहे. पं. रइधूरचित 'पुण्णासवकहाकोसु' ही रचना देखील अशाच प्रकारची आहे. याशिवाय अन्यही काही कथाकोष आहेत. त्यात संस्कृत-अपभ्रंश तथा अपभ्रंश हिंदी कथासंग्रह असल्याचे दिसतात.

तिसऱ्या प्रकारात काव्यकथा असून यात काव्य आणि कथा यांचे सुंदर, कलात्मक मीलन झाले आहे. यातील वर्ण्यविषय लोककथा हा असला तरी, त्यातील नायक जन जीवनाचा एक विशिष्ठ पैलू आहे. इतरांना तो आदर्श आहे. त्याचे मोठेपण त्याला जन्मतः प्राप्त झालेले नसूत ते त्याला विविध व मोठया संकटाशी टक्कर देऊन प्राप्त झाले आहे. अशा प्रकारचा कथासाहित्यात सर्वात प्रथम आपणाला 'भविष्यदत्तकथा' या कथेचा समावेश करता येईल. ही 'पंचमीव्रतकथा' या नांवाने देखील संबोधिली जाते. विबुध श्रीधरकृत 'भविसयत्तकहा' हा देखील त्यादृष्टीने एक महत्वाचा कथाग्रंथ आहे. लाखू विरचित्त 'जिणयत्तकहा' सिध्दसेनकृत 'विलासवईकहा' इत्यादी रचना अपभ्रंश कथासाहित्यातील कलात्मक सौंदर्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या आहेत. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**१) भविसयत्तकहा-** या कथाग्रंथाची रचना धनपाल या कवीने केली असून अपभ्रंश कथा साहित्यातील हे एक मौल्यवान कथारत्न मानले जाते. हे काव्य २२ संधीमध्ये विभागले असून, त्यात श्रुतपंचमी व्रताच्या फलवर्णन स्वरुपात भविष्यदत्ताची कथा सांगितली आहे. म्हणून हिला श्रुतपंचमीकथा असेही म्हटले आहे. या कथेचे जेकोबी यांनी जर्मन भाषेत प्रकाशन केले आहे. प्रथम या कथाग्रंथाकडे फक्त भाषेच्या दृष्टीने पाहिले जात होते. परंतु आता काव्य-कला, लोक तत्व, देशी शब्द, भाषा य दृष्टीनेही ही रचना अत्यंत महत्वाची समजली जाते. या ग्रंथाची रचना १३-१४ व्या शतकाच्या दरम्यान झाली असून कवि धनपाल हे स्वतः संप्रदायाचे अनुयायी होते.

साहित्यिकदृष्टया या कथेचे अवलोकन करीत असताना आपणाला असे दिसून येते की, भविसयत्तकहा ही अपभ्रंश कथासाहित्यातील एक अत्यंत यथार्थ व करुण कहानी आहे. कथाकाराने त्यातील घटनांचे व पात्रांचे चित्रण सुंदर केले आह. या कथानकात काही ठिकाणी मात्र अतिरंजितता दाखविलेली दिसून येते. या ग्रंथात जनबोली भाषेचे स्वरुपही दिसून येते. तसे पाहता ग्रंथाची भाषा साधी, सरळ, कृदंत शब्दरुपांनी युक्त असल्याचे दिसते.

**विलासवईकहा-**

विलासवई कथाग्रंथाची रचना श्वेतांबर जैन मुनि सिध्दसेनसूरि यांनी केली असून त्यांचे उपनाम साधारण असल्याचे म्हटले आहे. अर्थात हे गृहस्थावस्थेतील नाव असून मुनि अवस्थेतील नाव सिध्दसेनसूरि आहे. या

रचनाकृतीचा काल वि. स. ११२३ इतका मानला जातो. या कथेला हरिभद्रसूरिकृत समराइच्चकहा आधारभूत असून कवीने स्वतः याविषयी कबुली दिली आहे. यात सनत्कुमार व विलासवती यांच्या प्रेमाची चर्चा केली असून शेंवटी सनत्कुमाराला कसे वैराग्य उत्पन्न होते याचे वर्णन केले आहे.

या ग्रंथात नैसर्गिक सौंदर्याचे सुंदर वर्णन असून नायिका प्राप्तीसाठी नायकाने केलेल्या धाडसांचेही सुंदर वर्णन करण्यात आले आहे. कथेची सुरुवात वर्णनात्मक द.ष्टीने न होता एकाएकी झालेली दिसते. औत्सुक्य व कुतुहल यांनी ती परिपूर्ण आहे. कथेचा प्रवाह सतत व सारखेपणाने वहात जाणारा असून त्यात दुमिळता नाही. ग्रंथारंभी चोवीस तीर्थकर, सज्जन-दुर्जन वर्णन आलेले दिसते. सुंदर व कथानकाच्या दृष्टीने या कथेचे स्थान काही वेगळेच आहे. नगरवर्णन, वस्तुवर्णन, सरोवर वर्णन, राजमंदिर वर्णन, युध्द व यात्रा वर्णन, प्रकृति वर्णन, उद्यान वर्णन, समुद्र वर्णन, गंगा वर्णन, वसंत वर्णन या विविध वर्णनांनी ही कथा विभूषित झाली आहे.

जिणयत्तकहा-

पं. लाखू यांनी ही कथा लिहिली असून, अपभ्रंश कथा काव्यातील एक उत्तम रचना मानली जाते, यात कथा व काव्य यांचा सुंदर संगम झाला आहे. या कवीचा जन्म जैसवाल या वंशात झाला असून लाखू नावाच्या दोन कवींचा उल्लेख मिळतो. कथेचा रचनाकाल वि. सं. १२७५ मानला जातो. यात जिनदत्ताच्या विलासी जीवनाचे प्रथम वर्णन करुन, त्याने पुनःकशी दीक्षा घेतली याचे वर्णन केले आहेञ

या ग्रंथारंभी कवीने २४ तीर्थकरांचे स्मरण करुन त्यानंतर कालीदास, श्रीहर्ष, व्यास, द्रोण, बाण, पुष्पदंत, अकलंक या कवींचा आदराने उल्लेख केला आहे. त्यानंतर कवीने आत्मविनय प्रकट केला आहे. कवीने आपल्या ग्रंथात वस्तुवर्णन, नगरवर्णन, वरात वर्णन, विवाहवर्णन, बाजारवर्णन, समुद्रवर्णन, रुपवर्णन, संयोग व वियोगवर्णन अशा विविध वर्णनांनी केथेला सर्वांग परिपूर्ण बनविले आहे. रतिभाव हा प्रमुख आहे. कथेची भाषा प्रभावपूर्ण असून प्रसंगानुरुप तिच्यात रस, अलंकार, छंद, संवाद यांचा वापर केला आहे.

असे हे अपभ्रंश कथासाहित्य विविधतेने नटलेले व विभूषित झालेले दिसून येते.

**उपसंहार-**

जैन कथासाहित्याच्या वरील सर्व विवेचनावरुन आपणाला असे दिसून येईल की, कथा या गद्याप्रमाणे पद्यात देखील लिहिल्या जात होत्या. या कथा संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश शौरसेनी, पैशाची इत्यादि विविध भाषेतून लिहिलेल्या दिसतात. प्राकृत कथासाहित्यातील लेखकांचा दृष्टिकोन सदैव विशाल असलेला आपणाला दिसून येतो. त्यांनी धर्मकथेत शृंगाररसाचा जरी जास्तीतजास्त उपयोग करुन घेतला तरी आत्मकल्याण हा त्यातील सर्वात प्रमुख असा शेवटच हेतु आहे. या कथाकारांचा दृष्टिकोन वैराग्यपूर्ण जरी दिसत असला तरी आपल्या कथेतून त्यांनी विविध रसांचा उपयोग करुन घेतला आहे. त्यांनी लोकाभिरुचि डोळयासमोर ठेवूनच विविध बोली भाषेतून कथासाहित्याची निर्मिती केली. त्यात त्यांनी मदनउत्सव, वसंतक्रीडा, साहसपूर्ण घटना, प्रेमानुराग, हास्यविनोद व विविध प्रसंग यांचा समावेश केला आहे. प्राकृत तथा जैनकथेची रचनाशैली अत्यंत महत्वपूर्ण आहे. एका मुख्य कथेतुन इतर अनेक उपकथानकांची उत्पत्ति होणे ही तिची विशेषता आहे. कथांच्यामधून संपूर्णपणे चरित्राचा विकास झाला आहे.

विविध प्रकारच्या कामकथा वाचून व ऐकून लोक एकांतामध्ये अशा कथांचा आनंद उपभोगत असतात. तापाने फणफणणाऱ्या रोग्याला ज्याप्रमाणे साखर, गूळ इ. गोड पदार्थदेखील कडू लागतात, त्याप्रमाणे फक्त धर्मकथा ऐकण्यास अथवा वाचण्यास त्याला गोडी वाटत नाही. औषध पिण्यास नाकारणाऱ्या रोग्याला त्याला आवडणाऱ्या वस्तूतून औषध दिले जाते. त्याचप्रमाणे लोकांना आवडणाऱ्या कामकथा तथा शृंगार कथांच्याद्वारे

प्राकृतधर्मकथा लिहिल्या असून त्या सर्वसामान्य लोकांना पटण्या-रुचण्याइतपत मधुरमय करुन ठेवल्या आहेत. या प्रेमकथा मादक असून शृंगाररसपरिपूर्ण जरी असल्या तरी तितक्याच संसारक्षम आहेत. प्रेमाख्यान देखील धार्मिक तत्वाच्या साह्यानेच कथन केले आहे. म्हणूनच या विविध गोष्टींनी युक्त असलेले प्राकृतकथासाहित्य हे सर्वांगपरिपूर्ण आहे ही गोष्ट निर्विवाद आहे.

जैन कथासाहित्य इतके विशाल आहे की, त्याचा संपूर्ण आढावा एकाच ठिकाणी घेणे अत्यंत कठीण आहे. खरे पाहता या जैन साहित्यातील लोकसंस्कृती, त्यातील अध्यात्मवाद, या कथांमधून चित्रित झालेले सामाजिक जीवन, त्यातील आकर्षक सुभाषित रचना, जैन कथेतील लोक विश्वास, जैन कथेतील विविध पात्र, जैन कथेतील यतार्थ व आदर्शवाद जैन कथेतील निसर्गचित्रण, त्यांची रचना प्रक्रिया, साहित्यिक सौंदर्य, समुद्र यात्रा, जैन कथेतील सौन्दर्यबोध, जैन कथेतील न्याय व्यवस्था इत्यादि कितीतरी विभागावर स्वतंत्रपणे लेखन करात येईल. हे लेखन सूक्ष्मपणे अभ्यासू दृष्टीने करणे अत्यंत आवश्यक आहे. थोडक्यात भारतीय कथा साहित्यत जैन कथासाहित्याचा फार मोठा वाटा असून, या कथा साहित्याची छाप भारतीय कथा

साहित्यावर पडली आहे. एवढेच नव्हे तर या कथासाहित्याद्वारे भारतीय जनजीवनाचे व रीतिरिवाजांचे यथायोग्य चित्रण रेखाटण्यात आले आहे. आणि म्हणूनच काही परकीय विद्वानांनीदेखील जैन कथासहित्यावर अनक स्तुतिसुमने उधळली आहेत.